मंगळवार, १७ जानेवारी २०२३
♦ वर्ष १५ ♦ अंक १८०
www.ramprahar.com
राम प्रहर
♦ पाने ८ ♦ किंमत ₹ २ ♦ रायगड

## अंतरंग

मुरूड तालुका सुपारी संघाच्या चेअरमनपदी बाबा दांडेकर/२
रायगडात वाहतूक पोलिसांसमोर दंड वसुलीचे आव्हान/५
राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत रायगडच्या संतोष गावडेला रौप्यपदक/८

## शिवसेना आणि पक्षचिन्हावर आज पुन्हा सुनावणी



**मुंबई :** महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावरील सुनावणी जरी फेब्रुवारी महिन्यात होणार असली तरी शिवसेना कुणाची, धनुष्यबाण कुणाचे याचा निर्णय मात्र त्या आधीच होण्याची शक्यता आहे. शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण यावर मंगळवारी (दि. १७) सुनावणी होणार आहे. राज्यातील सत्तासंघर्षावर आणि शिवसेना पक्ष, चिन्हावरील कायदेशीर लढाई एकाचवेळी निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. सुप्रीम कोर्टात प्रकरण वारंवार लांबणीवर जात असताना आयोगातील कार्यवाही पद्धतशीर सुरू आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षप्रमुखपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ २३ जानेवारी रोजी संपत आहे. हा कायदेशीर पेच संपेपर्यंत त्यांना मुदतवाढ द्या, अशी मागणी ठाकरे गटाने आयोगाकडे केली आहे. आता त्यावर काय निर्णय होतो याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणूक : वेणूनाथ कडू यांचा उमेदवारी अर्ज मागे

# ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा मार्ग सुकर



**▌मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीतून वेणूनाथ कडू यांनी आपला उमेदवारी अर्ज सोमवारी (दि. १६) मागे घेत भाजप, शिवसेना, शिक्षक परिषद व मित्रपक्षांचे उमेदवार ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे यांना जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे.

कोकण भवन येथे राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत वेणूनाथ कडू यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. या वेळी महाराष्ट्र शिक्षक परिषेद व भाजप, शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या संदर्भात माहिती देताना मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की, कोकण शिक्षक मतदारसंघाची निवडणूक गेली अनेक वर्षे शिवसेना, भाजप आणि शिक्षक परिषद तिन्ही एकत्रितपणे लढवत होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सहकाऱ्यांनी पूर्ण महाराष्ट्रामध्ये असलेल्या विधान परिषदेच्या सर्व पाचही जागांसंदर्भात निर्णय घेत कोणती जागा शिक्षक परिषदेने लढवावी आणि कोणती जागा महाविकास आघाडीच्या विरोधात व कुणी लढवावी याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार नागपूरमधील जागा शिक्षक परिषदेचे नागो गाणार यांना देण्यात आली. त्या ठिकाणी शिवसेना-भाजपचा त्यांना पाठिंबा आहे, तर कोकण शिक्षक मतदारसंघाची उमेदवारी शिवसेना-भाजपचे ज्ञानेश्वर म्हात्रे यांना देण्यात आली. या ठिकाणी शिक्षक परिषद व इतर मित्र संघटनांचा त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यामुळेच आमचे शिक्षक मतदारसंघाचे पदाधिकारी आणि कोकणातील शिक्षकांचे नेते वेणूनाथ कडू यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. **(पान २ वर..)**



## भाजपचे 'मिशन २०२४'

**▌राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत विचारमंथन**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपच्या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीस सोमवारी (दि. १६) राजधानी दिल्लीत प्रारंभ झाला. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह देशभरातील प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली.

पहिल्या दिवशी पक्षाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी आगामी निवडणुकांवर भाष्य केले. २०२४च्या लोकसभा निवडणुकीची आतापासूनच तयारी सुरू करावी लागेल आणि या वर्षी नऊ राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवावा लागेल, असे ते म्हणाले.

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव हा भूमिपुत्रांचा विजय

### केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे प्रतिपादन | शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास राज्य सरकारने मंजुरी देणे हा भूमिपुत्रांचा विजय असून ही मागणी मी २०१५मध्ये संसदेत केली होती, असे प्रतिपादन केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सोमवारी (दि. १६) व्यक्त केले. ते जासई येथे आयोजित शेतकरी आंदोलनाच्या स्मृतिदिन कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमास लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी मंत्री जगन्नाथ पाटील, १९८४च्या आंदोलनातील रणरागिणी भारती पवार, उरणचे आमदार महेश बालदी, माजी आमदार मनोहर भोईर, उद्योजक जे. एम. म्हात्रे, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कामगार नेते महेंद्र घरत, सुरेश पाटील, माजी जि.प. सदस्य कुंदा ठाकूर, कॉ. भूषण पाटील, जेएनपीए संचालक दिनेश पाटील, रवींद्र पाटील, **(पान २ वर..)**





### एकत्र येऊन प्रश्न सोडवूया -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, दि. बा. पाटीलसाहेबांनी भूमिपुत्र, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांसाठी आपले आयुष्य वेचले. त्यांचा संघर्षमय आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण आपली जुनी ताकद जर जिवंत ठेवली तर आपल्याला मागण्या मान्य करण्यासाठी वारंवार विनंती करावी लागणार नाही. राजकारण हे फक्त निवडणकीपुरतेच करा आणि समाजकारण करतेवेळी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम केले पाहिजे. मग आपले राहिलेले प्रश्न सुटल्याशिवाय राहणार नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

## निवडक

### अयोध्येतील राम मंदिरावर दहशतवादी हल्ल्याचा कट

**अयोध्या :** जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने आत्मघातकी बॉम्बच्या माध्यमातून अयोध्येतील राम मंदिरावर हल्ला करण्याचा कट रचला आहे. येत्या २६ जानेवारी रोजी अयोध्येसह राजधानी दिल्ली आणि पंजाबमध्ये आयडीद्वारे स्फोट घडवून आणले जाऊ शकतात, अशीही माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. यानंतर अयोध्येतील सुरक्षा वाढविण्यात आली आहे.

### मुंबई मनपा आयुक्त चहल यांची ईडीकडून चौकशी

**मुंबई :** कोरोना काळात मुंबई महापालिकेत झालेल्या भ्रष्टाचारप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आयुक्त इक्बालसिंह चहल यांची सोमवारी (दि. १६) चौकशी केली. याबाबत भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आझाद मैदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, तर या घोटाळ्याची कॅगद्वारे चौकशी केली जाणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले होते.

## थंडी आणखी वाढणार!



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह महाराष्ट्रात काही दिवसांपासून तापमानाचा पारा खाली उतरत असून गारठा वाढला आहे. थंड वाऱ्यामुळे बोचऱ्या थंडीची जाणीव हळहळू होऊ लागली आहे. अजून दोन दिवस थंडीचा कडाका सहन करावा लागणार आहे.

उत्तरेतील बर्फवृष्टी, उत्तर आणि वायव्य दिशेदरम्यान येणारे वारे याच्या परिणामामुळे कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही केंद्रांवर परिणाम झाला आहे, तर राजस्थानमध्ये शीतलहर असल्याने त्याचा परिणाम उत्तर महाराष्ट्रावर होत आहे. त्यामुळे राज्यात पुढील दोन दिवस थंडीचा जोर आणखी वाढणार आहे.

१८ जानेवारीपर्यंत कोकणातील चार जिल्हे तसेच उत्तर महाराष्ट्रात आणि औरंगाबाद जिल्ह्याच्या काही भागात थंडीचा प्रभाव अधिक वाढण्याचा अंदाज आहे. राज्यामध्ये उर्वरित ठिकाणी सध्या थंडीचा प्रभाव अधिक नाही. मध्य भारतात प्रभावित असलेल्या उच्च दाबाच्या प्रत्यावर्ती चक्रीय वाऱ्यांच्या परीघ क्षेत्र महाराष्ट्रात दक्षिणेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे उत्तरेकडून येणाऱ्या थंडीला काहीसा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे या भागात थंडीची तीव्रता फारशी वाढलेली नाही, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान १७ ते २० जानेवारी या कालावधीत राज्यातील काही भागांमध्ये हलक्या पावसाचा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.

पुणे, नाशिक, धुळे, जळगावमध्ये पारा १० अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचा हवामानाचा अंदाज आहे, तर मुंबईत १७ जानेवारीपर्यंत थंडीची लाट असणार आहे. जानेवारीच्या सुरुवातीपासून सुरू झालेल्या कडाक्याचा थंडीचा परिणाम राज्यातील प्रत्येक भागात दिसत आहे.

## शेवटपर्यंत भाजपमध्येच राहणार -माजी आमदार देवेंद्र साटम

**खोपोली : प्रतिनिधी**

माझ्या बाबतीत कोणी काही बोलतात त्यांच्याशी मला काहीही घेणेदेणे नाही. मी भाजपमध्ये एक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पक्षप्रवेश केला. भाजपत देव, देश आणि धर्म यांचा विचार केला जातो आणि तो मी स्वीकारलेला आहे. भाजप माझ्यासाठी विचार आहे, अशा शब्दांत कर्जत-खालापूरचे माजी आमदार देवेंद्र साटम यांनी त्यांच्या शिवसेना ठाकरे गटात परतण्याच्या चर्चांना पूर्णविराम दिला. ते सोमवारी (दि. १६) चौक येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

भाजप नेते देवेंद्र साटम पुढे म्हणाले की, शिवसेनेत मी अनेक वर्षे काम केले आहे, पण जे विचार स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षात रूजविले ते विचार आजच्या शिवसेना ठाकरे गटात मला दिसत नाहीत. माझ्या मागे काही बोलले जाते याचा मी कधीच विचार करीत नाही. आज माझ्याबाबत असे बोलले जाते की मी शिवसेनेत प्रवेश करणार आहे. मी ज्या शिवसैनिकांना घडविले आहे त्यांना वाटत असेल की आता त्यांना सक्षम नेतृत्वाची गरज आहे. त्यामुळे त्यांच्या मते मी शिवसेनेचे नेतृत्व करावे. त्यांना तसे वाटणे स्वाभाविक आहे, मात्र मी ज्या शिवसेनेला कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघात यशाचे शिखर दाखविले तो पक्ष माझ्या पडत्या काळात कुठे होता? मला राजकारणातील कोणतेही पद उपभोगण्याची आशा शिल्लक नसल्याने मी आता असलेल्या भाजपमध्येच कायम राहणार असून कोणत्याही पक्षात जाणार नाही, असे ठामपणे सांगत साटम यांनी त्यांच्याबद्दल वावड्या उठविणाऱ्यांची बोलतीच बंद केली आहे.

मकारसंक्रांतीच्या निमित्ताने शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा स्नेहमेळावा खालापूर तालुक्यातील नढाळ येथील पंचायतन मंदिरात झाला. या वेळी बोलताना जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर यांनी, येत्या २३ जानेवारी रोजी शिवसेनाप्रमुखांची जयंती असल्याने या दिवशी माजी आमदार देवेंद्र साटम शिवसेनेत दाखल होणार आहेत, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे चर्चा सुरू झाली होती. या चर्चेला स्वतः देवेंद्र साटम यांनी पत्रकार परिषद घेऊन उत्तर दिले. **(पान २ वर..)**



(छाया : विनायक माडये)

### वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

*कर्जत-खालापूरचे माजी आमदार देवेंद्र साटम यांच्यावर आजही या मतदारसंघातील लोकांचे, कार्यकर्त्यांचे अपार प्रेम असल्याचे चित्र सोमवारी त्यांच्या वाढदिवशी दिसून आले. त्यांना भाजपसह शिवसेना शिंदे गट व ठाकरे गट, काँग्रेस, राष्ट्रवादी अशा सर्व पक्षांतील नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.*

# पनवेलमध्ये रंगला पतंग महोत्सव

### मान्यवरांची उपस्थिती; नागरिकांनी लुटला आनंद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करून मकरसंक्रांत सण रविवारी (दि. १५) मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. तसेच या महोत्सवाला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देत आयोजकांचे कौतुक करीत सर्वांना मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.

या महोत्सवात लहानग्यांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनी पतंग उडवण्याचा आनंद घेतला. ही परंपरा पुढे चालत रहावी म्हणून या ठिकाणी लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी रंगीबेरंगी तसेच कार्टून असलेले पतंग देण्यात आले. या वेळी लाईव्ह म्युझिक, सेल्फी पॉईंट उभारण्यात आले होते. पतंग उडवताना लागणारा मांजा पक्ष्यांसाठी धोकादायक असल्याने या पतंग महोत्सवात मांजा वापरण्यास बंदी होती.

या महोत्सवास माजी नगरसेविका दर्शना भोईर, उद्योजक राजू गुप्ते, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, स्वप्नील ठाकूर, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रशांत पोद्दार, उल्हास झुंझारराव, शेखर म्हात्रे, प्रशांत झुंझारराव, विजय शिंदे, संदीप पाटील, प्रवीण मोरबाळे यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिक्षक, पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या लढती ठरल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा सोमवारी (दि. १६) अखेरचा दिवस होता. अर्ज माघारीनंतर नाशिक, औरंगाबाद, नागपूर, कोकण आणि अमरावती येथील निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे.



नाशिक पदवीधर मतदारसंघात शेवटच्या दिवशी सहा उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता १६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या ठिकाणी आमदार सुधीर तांबे यांचे पुत्र व अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे आणि अपक्ष म्हणूनच अर्ज भरणाऱ्या व महाविकास आघाडीचा पाठिंबा असलेल्या शुभांगी पाटील यांच्यात लढत आहे.

अमरावती पदवीधर निवडणुकीसाठी एका जागेसाठी २३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. शेवटच्या दिवशी १० उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. भाजपचे उमेदवार डॉ. रणजीत पाटील आणि 'मविआ'चे धीरज लिंगाडे यांच्यात मुख्य लढत आहे.

नागपूर शिक्षक मतदारसंघात एकूण २७ अर्ज आले होते. त्यापैकी पाच उमेदवारांनी उमेदवारी माघार घेतली. त्यामुळे आता २२ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये भाजपचा पाठिंबा असणारे नागो गाणार पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून उमेदवार असून त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत आठ उमेदवार रिंगणात आहेत. पाच जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. यामध्ये वेणूनाथ कडून यांनी अर्ज मागे घेतल्याने भाजप युतीचे ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे पारडे जड दिसत आहे. औरंगाबादमध्ये १५पैकी एकाने माघार घेतल्याने आता एकूण १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहे. येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रदीप सोळुंके यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवत बंडखोरी केली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे उमेदवार विक्रम काळे यांना धोका निर्माण झाला आहे. सर्व ठिकाणी ३० जानेवारी रोजी मतदान, तर २ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

# ‘शिवसंग्राम’ भाजपसोबतच निवडणुका लढवणार

## प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांचे प्रतिपादन

**महाड : प्रतिनिधी**

२०१४पासून शिवसंग्राम संघटना भाजपबरोबर काम करीत आहे. येणार्‍या काळातही सर्व निवडणुका ‘शिवसंग्राम’चा भारतीय संग्राम परिषद हा पक्ष भाजपसोबतच राहून लढवेल, असे प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांनी सोमवारी (दि. १६) येथे जाहीर केले.

शिवसंग्राम संघटनेच्या पदाधिकार्‍यांचा कोकण दौरा सुरू असून या निमित्ताने महाडमध्ये पत्रकार परिषद घेऊन शिवसंग्रामची भूमिका स्पष्ट करण्यात आली. शिवसंग्राम संघटनेचे नेते विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर त्यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिवसंग्राम पुन्हा एकदा जोमाने कामाला लागली असून महाराष्ट्रात विविध कार्यक्रम आणि राज्य पातळीवर मेळाव्याचे आयोजन केले जात आहे. याबाबत बोलताना प्रदेशाध्यक्ष शिंदे यांनी शिवसंग्राम संघटना ही भाजपसोबत काम करत असून राज्यात मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी



शिवसंग्रामच्या वतीने विनायकराव मेटे यांनी प्रथम लढा उभा केला होता, मात्र मराठा आरक्षण मिळू नये म्हणून काही नतद्रष्टांनी जाणीवपूर्वक अडथळे आणल्याचा आरोप केला. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे अंतरराष्ट्रीय पातळीवरील स्मारक मुंबई येथील अरबी समुद्रात उभे राहण्यासाठी मेटे यांनी विशेष मेहनत घेतली होती. हे काम लवकरच सुरू होऊन पूर्णत्वास जावे, असे ते म्हणाले.

शिवसंग्राम संघटना सात मुद्दे घेऊन राज्यात संघटनात्मक बांधणीसाठी दौरा करत असून या सात मुद्यांपैकी मराठा आरक्षण आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक यासह अन्य मुद्दे आहेत. पत्रकार परिषदेस प्रदेशाध्यक्ष तानाजी शिंदे यांच्यासह, सरचिटणीस विक्रांत आंब्रे, मुंबई अध्यक्ष दिलीप माने, संस्कृतिक विभाग प्रमुख दीपक कदम, प्रदेश सचिव हिंदुराव जाधव, मुंबई जिल्हा अध्यक्ष योगेश विचारे, श्री. मालुसरे, रायगड जिल्हा सरचिटणीस अनंत देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या खारघर मॅरेथॉनपूर्व स्पर्धांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल, खारघर रहिवासी कल्याण संघटना व रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जानेवारी रोजी खारघर मॅरेथॉन ही स्पर्धा आयोजित केली आहे. खारघरमधील महाविद्यालयात विविध स्पर्धा घेतल्या. या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या स्पर्धा १० ते १६ जानेवारी या कालावधीत घेण्यात आल्या. यामध्ये महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा, एकपात्री अभिनय व भित्तिपत्रक तसेच ब्लॉग लेखन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. एकपात्री अभिनय स्पर्धेमध्ये राजश्री सुर्वे यांनी प्रथम क्रमांक व शिवांशू काळे याने द्वितीय क्रमांक तसेच प्रगती मिश्रा हिने तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच भित्तीपत्रक स्पर्धेत शिवानी कुमारी प्रथम, चेतन तामखाने द्वितीय व साक्षी पाटील व मेहेर हमीद खान यांनी तृतीय क्रमांक पटकाविले.

याचबरोबर ब्लॉग लेखन स्पर्धेमध्ये २६ स्पर्धकांनी भाग घेतला. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांनी या स्पर्धामध्ये स्पर्धकांना भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले व विजेत्यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे कार्यकारी संचालक परेश शेठ ठाकूर, तसेच पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेळोवेळी खारघर मॅरेथॉन पूर्व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. या सर्व विजेत्यांना २२ जानेवारी रोजी खारघर मॅरेथॉन २०२३ स्पर्धेच्या दिवशी पारितोषिके तसेच प्रमाणपत्र दिली जाणार आहेत.

## निवडक

### मंगळसूत्र खेचून चोरटा पसार

पनवेल : शहरातील तक्का रोड येथील महावीर फर्निचर



दुकानासमोर चालत जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून सराईत चोर दुचाकी वाहनावरुन पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विनी सांडगे या नेटसेटच्या स्टडी करिता आंबेडकर भवन येथील अभ्यासिकेमध्ये पायी चालत जात असताना महावीर फर्निचर दुकान, तक्का रोड या ठिकाणी पाठीमागून स्कुटीवरून आलेल्या अनोळखी इसमाने अश्विनी यांच्या गळ्यातील ३५ हजार रुपये किमतीचे ११ ग्रॅम वजनाची सोन्याचे मंगळसूत्र व ओप्पो मोबाईल फोन जबरदस्तीने खेचून घेऊन गेला.

### पोलिसांसाठी आज दरबार

**पनवेल :** नवी मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी मंगळवारी (दि. १७) कळंबोली येथील मुख्यालयात दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये संपूर्ण आयुक्तालयातील जवळपास ६०० अधिकारी व कर्मचारी यांना बोलवण्यात आले आहे. त्यांच्या कामकाजाशी संबंधित समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्याच्या उद्देशाने हा दरबार घेतला जाणार आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडून सर्वसामान्यांप्रमाणेच पोलिसांच्या देखील समस्या सोडवण्यावर भर दिला जात आहे. या दरबाराच्या माध्यमातून थेट आयुक्तांपर्यंत आपल्या समस्या मांडता येणार असल्याचा आनंद अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून व्यक्त होत आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** उपजिल्हा रूग्णालय येथील गेट बाहेर पार्क करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.
बहिणीच्या प्रसूतीकरिता आलेल्या रूपाली एकनाथ भाटकर यांनी आपली ३० हजार रुपये किमतीची निळया रंगाची सुझुकी अक्सेस १२५ मोटारसायकल (MH46 BR ३१४४) पनवेल उपजिल्हा रूग्णालय येथील गेट बाहेर पार्क करून ठेवली होती. मात्र अज्ञात चोरट्याने त्यांची मोटारसायकल चोरून नेल्याने याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दुचारी चोरी झाल्याचची तक्रार दाखल केली आहे.

# औद्योगिक क्षेत्रात सुरक्षितता, आरोग्याला महत्त्व

## सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अंकुश खराडे यांचे कार्यशाळेत मत

**खोपोली : प्रतिनिधी**

कारखान्यांमध्ये उत्पादनाबरोबर, कामगारांची सुरक्षितता व आरोग्य महत्त्वाचा घटक आहे. यासाठी व्यवस्थापन व कामगारांनी पूर्णपणे काळजी घेणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचे औद्योगिक व सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अंकुश खराडे यांनी खोपोली येथे आयोजित एकदिवसीय शिबिरात केले.

खोपोलीसह खालापूर तालुक्यातील कारखान्यातील अधिकारी व कामगारांसाठी इंडस्ट्रियल असोशियन खोपोली तसेच राज्य शासनाच्या औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (रायगड विभाग) यांच्या विद्यमाने, प्रथमोपचार आणि उत्तम



सुरक्षितता या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिबिराचे उद्घाटन प्रसंगी अंकुश खराडे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा सानयो स्पेशल स्टीलचे वरिष्ठ उपाध्यक्ष अविनाश सोमवंशी, संस्थेचे सचिव व अल्टा कंपनीचे वरिष्ठ अधिकारी व्ही एस चुरी, संस्थेचे खजिनदार तथा वर्टशिला डीझेल कंपनीचे कार्मिक व्यवस्थापक शशिकांत शेट्टी, अल्टा कंपनीचे मॅनेजर बी. एस. म्हात्रे, शिबिराचे प्रमुख वक्ते डॉक्टर मंजीतसिंग अरोरासह मान्यवर उपस्थित होते.

सानयो स्पेशल स्टीलचे अविनाश सोमवंशी यांनी कारखान्यात काम करताना प्रत्येकाने काळजीपूर्वक काम करण्याचे आवाहन केले. याचवेळी अल्टा कंपनीचे व्ही. एस. चुरी व बी. एस. म्हात्रे यांनीही औद्योगिक सुरक्षिततेबद्दल विचार मांडले.

यावेळी दिवसभरातील सत्रामध्ये कारखान्यातील सुरक्षितता, प्रथमोपचार, अपघातग्रस्तांना तातडीची मदत यासंबंधीची माहिती स्लाईड शो व काही उदाहरणे प्रात्यक्षिकासह डॉक्टर मंजीतसिंग अरोरा यांनी सादर केली.

शिबिर यशस्वी करण्यासाठी खोपोली इंडस्ट्रियल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व सुरक्षा व्यवस्थापक विश्वास पाटील, गोविंद ढाकणे, सचिन पवार, मंगेश हडप यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन विश्वास पाटील (शानयो स्पेशल स्टील) यांनी केले. तर आभार प्रदर्शन शशिकांत शेट्टी यांनी केले.

# मुरूड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या चेअरमनपदी बाबा दांडेकर

## उपाध्यक्षपदी मोअज्जम हसवारे यांची निवड

**कर्जत : प्रतिनिधी**

सुपारी संघाच्या मुख्य कार्यालयात सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक घेण्यात आली. विरोधी गटाने कोणताही अर्ज सादर न केल्याने निवडणूक बिनविरोध जाहीर करण्यात आली. विरोधी गटाकडून निवडून आलेले डॉक्टर अमित बेनकर यांनी या निवडीसाठी सूचक म्हणून शिफारस केली आहे. यावेळी सर्व मान्यवरांकडून त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

कोणताही अर्ज न आल्याने सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांनी चेअरमन म्हणून बाबा दांडेकर व उपाध्यक्ष म्हणून मोअज्ञम हसवारे यांची निवड जाहीर केली.

दांडेकर यांनी सांगितले, संघात काम करणार्‍या सर्व कामगारांना योग्य न्याय मिळवून देणार आहे.त्यांच्या आरोग्याची



सुद्धा काळजी आगामी काळात घेतली जाणार आहे.वेतन वृद्धीवर सुद्धा विचार केला जाणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. कार्यक्रमात नवनिर्वाचित उपाध्यक्ष मोअज्ञम हसवारे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सुपारी संघाचे संचालक प्रवीण चौलकर, अमोल उपाध्ये, अविनाश भगत, आण्णा कंधारे, विनोद भगत, प्रकाश रणदिवे, हिफाजूरहेमान शेख, विकास दिवेकर, हाफिज कबले, रामजी वणे, डॉक्टर अमित बेनकर, भाग्यश्री बेलोसे, आसिया घलटे, राजेंद्र गुरव, नरेश पाटील, अ‍ॅड. इस्माईल घोले, फैरोज घलटे, अजित कासार, भाजपचे मुरुड शहर अध्यक्ष उमेश माळी, सुधीर पाटील, सीए अशोक जोशी, विजय पैर, बाळा गुरव, नितीन पवार, राजेंद्र पोतनिस, उपप्राचार्य डॉक्टर विश्वास चव्हाण, इस्माईल शेख, सचिन पाटील, अ‍ॅड. मृणाल खोत, प्रमिला माळी, माजी सभापती चंद्रकांत कमाने आदी उपस्थित होते.

# भाजप प्रदेश माध्यम प्रमुखपदी नवनाथ बन

**मुंबई : वृत्तसंस्था**

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश माध्यम विभाग प्रमुखपदी पत्रकार नवनाथ बन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी श्री. बन यांच्या नियुक्तीची घोषणा केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत नागपूरमध्ये श्री. बन यांनी रविवारी भाजपामध्ये प्रवेश केला.



गेल्या १५ वर्षांपासून पत्रकार नवनाथ बन हे माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. दैनिक गावकरीपासून त्यांच्या पत्रकारितेतील कारकीर्द सुरू झाली. मराठवाडा नेता या वृत्तपत्रांत तसेच एबीपी माझा या वृत्तवाहिनीमध्ये त्यांनी काम केले. विद्यार्थीदशेत त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम केले. नवनाथ बन यांना माध्यम क्षेत्राचा मोठा अनुभव असून, भारतीय जनता पार्टीची धोरणे, विचारधारा सामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचे काम ते करतील, असे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले आहे.

पान १ वरुन

### ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या विजयाचा मार्ग सुकर

या वेळी वेणूनाथ कडू यांनी सांगितले की, गेली ३५ वर्षे महाराष्ट्र शिक्षक परिषद आणि भाजप या मतदारसंघात निवडणूक लढतो. त्या अनुषंगाने स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला फोन केला. गेली ३५ वर्षे मला त्यांनी साथ दिली आहे. त्यामुळे त्यांच्या शब्दाचा आदर करीत मी स्वखुशीने माझा उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.

### नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चे नाव हा भूमिपुत्रांचा विजय

जासईचे सरपंच संतोष घरत, पागोटेचे सरपंच कृणाल पाटील, कृष्णकुमार भारती, ‘दिबां’चे पुत्र व महात्मा फुले सामाजिक प्रबोधन आणि परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अतुल पाटील आदी उपस्थित होते.

शेतकर्‍यांच्या न्याय्य हक्कांसाठी जानेवारी १९८४ साली प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली उरण तालुक्यात प्रखर लढा उभारण्यात आला होता. या लढ्यात जासई येथे १६ जानेवारी १९८४ रोजी नामदेव शंकर घरत (चिर्ले) आणि रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतुम) हे पोलिसांच्या गोळीबारात हुतात्मा झाले, तर दुसर्‍या दिवशी नवघर फाट्यावर जमलेल्या शेतकर्‍यांवरही गोळीबार करण्यात आला. यात कमलाकर कृष्णा तांडेल, महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील यांना हौतात्म्य आले. या शौर्यशाली व गौरवशाली लढ्याचा स्मृतिदिन दरवर्षीप्रमाणे होत असतो.

यानिमित्त मान्यवरांनी चिर्ले व धुतूम येथे हुतात्म्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, तर जासईत ‘दिबां’च्या पुतळ्यास अभिवादन करून स्मृतिदिन कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून गजानन म्हात्रे यांनी प्रकाशित केलेल्या ‘विमानतळ–एक संघर्ष’ या पुस्तकाचे आणि प्रकाश तांडे यांनी गायलेल्या ‘विसर न व्हावा ऐसा घडला आंदोलन तो उरणांचा’ या गाण्याच्या सीडीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नवी मुंबई विमानतळ हे देशातील सर्वांत व्यस्त विमानतळ ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक विमान उडताना व उतरताना आपले नेते दि. बा. पाटील यांच्या नावाची घोषणा होणार आहे. आपल्या भूमीवर ‘दिबां’च्या नावाची उद्घोषणा हा अभिमानाचा क्षण ठरणार असल्याचे या वेळी केंद्रीय मंत्री कपिल पाटील म्हणाले. इतर मान्यवरांनीही विचार मांडले. ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### शेवटपर्यंत भाजपमध्येच राहणार -माजी आमदार देवेंद्र साटम

या वेळी साटम यांनी आपला पूर्वाश्रमाचा इतिहास पत्रकारांसमोर मांडला. स्व. बाळासाहेबांच्या निधनानंतर शिवसेनेचे विचार बदलले आणि हेच बदललेले विचार मला न पटल्याने मी भाजपमध्ये आलो आहे. मला लोकांनी खूप प्रेम दिले आहे. चौक ग्रामपंचायतीचे १६ वर्षे सरपंच दिले. पुढे कर्जत–खालापूर विधानसभा मतदारसंघाचा मी आमदार झालो. शिवसेनाप्रमुखांनी मला या मतदारसंघाचे नेतृत्व करण्यासाठी पाच वेळा संधी दिली, मात्र आपल्याच शिवसेना पक्षातील हितशत्रूंमुळे माझा या पाच वेळच्या संधीत दोनदा पराभव झाला. असे असले तरी मी जनताजनार्दनाची सेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून आजही काम करीत आहे, असे त्यांनी नमूद केले.

पत्रकार परिषदेस देवेंद्र साटम यांच्यासमवेत भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, ज्येष्ठ नेते अ‍ॅड. राजेंद्र येरूणकर, खालापूर तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे आदी उपस्थित होते.

## विभागीय माहिती कार्यालयास भाषा संचालकांची सदिच्छा भेट



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाषा संचालक महाराष्ट्र राज्य श्रीमती विजया डोनीकर यांनी सोमवारी कोकण विभागीय माहिती कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

१४ ते २८ जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येणार्‍या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कोकण भवनात आयोजित पुस्तक प्रदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलेल्या विजया डोनीकर यांना कोकण विभागीय उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी महाराष्ट्र शासनाचे मुख्यपत्र असलेले लोकराज्य मासिक भेट देऊन त्यांचे स्वागत केले. डोनीकर यांनी विभागीय माहिती कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी मुंबई व कोकण विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश शेट्ये, कोकण विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले तसेच विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत आठ उमेदवार रिंगणात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीत १३ ते १६ जानेवारी २०२३ या नामनिर्देशन मागे घेण्याच्या कालावधीत सोमवारी (दि. १६) दुपारी ३.०० वाजेपर्यंत एकूण १३ उमेदवारी अर्जांपैकी ५ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले आहेत. अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक २९/१२/२०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र विधान परिषदेसाठी कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार ५ ते १२ जानेवारी २०२३ या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या कालावधीत छाननी दरम्यान १३ उमेदवारांचे नामनिर्देशन वैध ठरवून स्विकृत करण्यात आले होते.

यापैकी १) कडू वेणुनाथ विष्णु, अपक्ष, २) घोन्साल्वीस जिमी मतेस, अपक्ष ३) बळीराम परशुराम म्हात्रे, अपक्ष ४) बाळाराम गणपत पाटील, अपक्ष, ५) ज्ञानेश्वर पुंडलिक म्हात्रे, अपक्ष या पाच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज जागे घेतले आहेत.

वर नमूद पाच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने निवडणूक लढविणार्‍या उमेदवारांची संख्या आठ झाली आहे. ते पुढीलप्रमाणे १) म्हात्रे ज्ञानेश्वर बारकु, भारतीय जनता पार्टी, २) धनाजी नानासाहेब पाटील, जनता दल (युनायटेड), ३) उस्मान इब्राहिम रोहेकर, अपक्ष, ४) तुषार वसंतराव भालेराव,अपक्ष, ५) देवरुखकर रमेश नामदेव, अपक्ष ६) बाळाराम दत्तात्रेय पाटील, अपक्ष, ७) प्रा. सोनवणे राजेश संभाजी, अपक्ष, ८) संतोष मोतीराम डामसे, अपक्ष असे आहेत.

कोकण विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीचे मतदान सोमवार ३० जानेवारी रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत होणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

# ‘नैना’संबंधी सर्व समस्या सोडविणार

## आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी नैना प्राधिकरण संबंधितांच्या सर्व समस्या सोडविणार असल्याची ग्वाही ऑल इंडिया रियल इस्टेट असोसिएशन सोबतच्या नियोजित बैठकीत दिली.

रविवारी (दि. १५) नियोजित ठरल्याप्रमाणे ऑल इंडिया रियल इस्टेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नैना प्राधिकरण क्षेत्रात अंमलात आणण्याबाबत बैठक घेतली. या वेळी ठोस निर्णायक शासनाकडून आदेश देण्यात यावेत आणि नैना प्राधिकरणाकडून नियोजनाबाबत काही त्रुटी आहेत, त्या कशाप्रकारे दुर करता येतील याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) बाबतीत स्वतः पत्र पाठवून संबंधित विभागाचे मंत्री आणि संबंधित प्रमुख अथवा संचालकांना कळविण्यात आलेले आहे. नैना प्राधिकरण क्षेत्रातील विकास अथवा बांधकाम करण्यास येणाऱ्या बांधकाम व्यावसायिक तसेच नैना क्षेत्रातील विकासावर आधारीत सर्वेच क्षेत्रातील कर्मचारी वर्ग अथवा बांधकाम मटेरियल सप्लायर अथवा कामगार यांच्यासह अन्य सर्वांच्या समस्यांबाबत लवकरात लवकर निवारण करू, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आजच्या चर्चेतून दिली आहे.

ही चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील ऑल इंडिया रियल इस्टेट असोसिएशनचे सेक्रेटरी अजीत दशरथ रोकडे, महेश गोगांवकर, प्रदीप भोपी, महा इस्टेट रायझिंग असोसिएशन सरचिटणीस राकेश सर्वे, दर्शन सिंग, अरविंद विश्वकर्मा, कारभारी, उमेश पटेल तसेच पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आदी सहभागी होऊन होते.

**उरण : शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात प्रखर लढा उभारण्यात आला होता. या लढ्यात जासई येथे १६ जानेवारी १९८४ रोजी नामदेव शंकर घरत (चिर्ले) आणि रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतुम) हे पोलिसांच्या गोळीबारात हुतात्मा झाले, तर दुसऱ्या दिवशी नवघर फाट्यावर जमलेल्या शेतकऱ्यांवरही गोळीबार करण्यात आला. यात कमलाकर कृष्णा तांडेल, महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील यांना हौतात्म्य आले. या शौर्यशाली व गौरवशाली लढ्याचा स्मृतिदिन दरवर्षीप्रमाणे होत असतो. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी मान्यवरांनी चिर्ले, धुतूम येथे हुतात्म्यांच्या व जासईत ‘दिबां’च्या पुतळ्यास अभिवादन केले.**





(छाया : विकास म्हात्रे)





## ‘रोटरी’तर्फे किफायतशीर दरात आरोग्य तपासण्या

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल एलिटतर्फे अत्यंत किफायतशीर दरात आरोग्य तपासण्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या तपासणी शिबिराचे माजी प्रांतपाल डॉ. शैलेश पालेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या शिबिरामध्ये यकृत प्रोफाइल, लिपिड प्रोफाइल, किडनी प्रोफाइल, व्हिटॅमिन बी १२ आणि व्हिटॅमिन डी, थायरॉईड चाचण्या, मधुमेह चाचण्या, ग्लायसेटेड हिमोग्लोबिन, संपूर्ण रक्तगणना आणि इतर चाचण्या सिटीएल लॅबमार्फत करण्यात आल्या. या शिबिराचा लाभ ६५ नागरिकांनी घेतला तर सुमारे ४०हुन अधिक नागरिकांचे टूडी इको चाचणी करण्यात आले.

या वेळी डॉ. मंगेश डाके, डॉ. पुष्कर लिखिते, डॉ. निलेश बांठिया, डॉ. नील, डॉ. स्वाती लिहिते, डॉ. मनोज मुनोत, सचिन बंठिया, महेंद्र सुराणा, आदित्य जोशी, मंजुश्री पटवर्धन आदी उपस्थित होते.



## गव्हाण विद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘दहावी नंतर पुढे काय?’ या विषयानुशंगाने व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.



खारघर येथील सरस्वती तंत्रज्ञान महाविद्यालयाचे मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अर्जुन कदम, प्रा. मयुरेश नायकवडे व संतोष ठाकूर यांनी प्रोजेक्टर च्या साहाय्यानने इयत्ता दहावीनंतर पुढे कोणकोणत्या व्यवसायिक संधी उपलब्ध आहेत याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

या व्यवसाय मार्गदर्शन शिबिरामध्ये इयत्ता दहावीचे दीडशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. व्यवसाय मार्गदर्शन शिबिराच्या स्वागत समारंभाचे प्रास्तविक करताना विद्यालयाचे उपशिक्षक सागर रंधवे यांनी व्यावसायिक संधीची उपलब्धता मुबलक प्रमाणात असूनही विद्यार्थी व पालकांच्या अनभिज्ञतेमुळे विद्यार्थ्यांची धांदल उडताना दिसते.आणि म्हणून विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार भविष्यातील शिक्षणाच्या व व्यवसायाच्या विविध क्षेत्रातील संधींची माहिती असेल तर आधी पासूनच तयारी करणे सोईस्कर ठरते.

प्रा. अर्जुन कदम, प्रा. मयुरेश नायकवडे व संतोष ठाकूर यांनी प्रोजेक्टरच्या सहाय्यानने इयत्ता दहावीनंतर पुढे कोणकोणत्या व्यवसायिक संधी उपलब्ध आहेत याचे सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले.

या व्यवसाय मार्गदर्शन शिबिरामुळे दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन पुढे आमच्या मर्जीप्रमाणे कोणकोणत्या क्षेत्रांची निवड करावी याचे यशस्वी आराखडे बांधता येतील याचे मार्गदर्शन लाभले तसेच विचारलेल्या प्रश्नांना अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण उत्तरे मिळाल्याचे इयत्ता दहावी ब ची विद्यार्थिनी भूमिका तांडेल हिने सांगितले. या व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे प्रास्तविक सागर रंधवे यांनी केले, तर आभार गुरूकुल प्रमुख संदीप भोईर यांनी मानले.

## सेक्स वर्कर, ट्रान्स जेंडरसाठी मकरसंक्रांतीनिमित्त हळदीकुंकू

**पनवेल : प्रतिनिधी**

लोकपरिषद आणि आश्रय सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी महिला सेक्स वर्कर आणि ट्रान्स जेंडरसाठी संक्रांतीनिमित्त हळदीकुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी त्यांना शिधा वाटप पत्रिकांचेही करण्यात आले.

संक्रांतीनिमित्त सध्या सगळीकडे हळदी कुंकवाचे कार्यक्रम सुरू आहेत. पनवेलमधील लोकपरिषद आणिआश्रय सोशल फाऊंडेशन यांनी समाजातील दुर्लक्षित घटक असलेल्या महिला सेक्स वर्कर आणि ट्रान्स जेंडरसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम सोमवारी (दि. १६) आपल्या कार्यालयात आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष अशोक गायकवाड, महसूल शाखेचे बाळू रजाने, प्रकल्प व्यवस्थापक उर्मिला यादव, शिल्पा हळणकर, लेखापाल रुकिया बारगीर, दिक्षिता गावंड-बोरकर, समुपदेशक मनीषा पवार, अश्विनी सावंत, पर्यवेक्षिका निता जाधव, प्रज्ञा कांबळे, संजीवनी सावंत, जयश्री जाधव व मिनल मोहिते उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला १५० सेक्स वर्कर महिला व ४० ट्रान्स जेंडर उपस्थित होते. या वेळी त्यांना शिधा पत्रिकांचे वाटप उपस्थितांचे हस्ते करण्यात आले. लोकपरिषद आणि आश्रय सोशल फाऊंडेशन यांच्या सेक्स वर्कर आणि ट्रान्स जेंडरसाठीच्या हळदीकुंकवाचा कार्यक्रमाचे सगळीकडे कौतुक होत आहे.



### आंतर महाविद्यालयीन फेस्टिवलमध्ये

## रामशेठ ठाकूर कॉलेजचे यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी जे. के. शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयात (घणसोली नवी मुंबई) १६ जानेवारी रोजी आंतर महाविद्यालयीन फेस्टिवल आव्हान अंतर्गत वेगवेगळ्या संस्कृती स्पर्धा आयोजित केल्या करण्यात आल्या होत्या.

यामध्ये प्रामुख्याने वैयक्तिक गायन, एकल नृत्य, मेकअप स्पर्धा व ग्रुप डान्स अशा वेगवेगळ्या स्पर्धा होत्या. या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. ग्रुप डान्समध्ये प्रथम क्रमांक, मेकअप स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक दीक्षा वासकर हिने पटकाविला, सोलो सिंगिंगमध्ये हर्षल शिंदे एस वाय बी कॉम यांनी प्रथम क्रमांक पटकाविला तसेच सोलो डान्समध्ये प्राणदीप बोराह याने प्रथम क्रमांक पटकाविला.

प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी सर्व विजेतांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या तसेच महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राहुल कांबळे व इतर सर्व प्राध्यापक वृंद यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.




**पनवेल : मकरसंक्रांतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन ठिकठिकाणी करण्यात आले होते. त्या अंतर्गत उलवे सेक्टर १७ येथे उलवे हिमाचली ग्रुपच्या माध्यमातून लोहडी मिलन महोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम रंगला. या महोत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, अमित नाईक, रामप्रकाश गौतम, अशोक गौतम, अशोक शर्मा, अभिषेक ठाकूर, संजय कपूर, राजेश पंडित, अजय शर्मा, सुधीर शर्मा आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)



**पनवेल : श्री संत वामनभाऊ महाराज, श्री संत भगवानबाबा महाराज व श्री संत नारायण महाराज यांच्या पुण्यातिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. बामणडोंगरी येथे सुरू असलेल्या या सप्ताहाची सांगता रविवारी काल्याच्या कीर्तनाने झाली. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप नेते अंकुश ठाकूर, भाजप युवा मोर्चा उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, विक्रम कोळी, दीपक गोंधळी आदी उपस्थित होते.**



**कामोठे : सालाबादप्रमाणे जय गोपीनाथ प्रतिष्ठान दिनदर्शिका भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना भेट देण्यात आली. भाजप युवा नेते व संस्थेचे अध्यक्ष सुभाष आंधळे, संस्थेचे मार्गदर्शक बबन बारगजे, सचिव हनुमंत विघ्ने, जिल्हाध्यक्ष रामदास सांगळे आदी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी संस्थेचे कार्य व पुढील कार्यक्रमाबद्दल चर्चा झाली.**



**पनवेल : माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या दिनदर्शिकेचे भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या वेळी कंचन कुमार बिर्ला, प्रिया राजकुमार, छाया हरेल, मोहन भुजबळकर, टीपीएस नायर, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, राजू शर्मा, संजय शर्मा, संजय महाडिक आदी उपस्थित होते.**





**कळंबोली : भाजप आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात शनिवार व रविवार दोन दिवस मोफत नेत्र तपासणी व कमी दरात चष्मा बनवून देण्याचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शेकडो रहिवाशांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिर भाजप शहर अध्यक्ष रविनाथ पाटील व जनसंपर्क कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल यांच्या सौजन्याने व लेन्स व्हिजन ऑप्टिकल आणि अनिल आय हॉस्पिटलचे डॉ. कृष्णदेव धनावडे, रश्मीता घरत, प्राची पाटील आदींच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते.**

## मयत व्यक्तीच्या नावाचे बनावट आधार कार्ड बनविणाऱ्यांना शिक्षा

**पनवेल : वार्ताहर**

मयत व्यक्तीच्या नावाचे बनावट आधार कार्ड बनविणाऱ्यांना न्यायालयात हजर केले असता शिक्षा सुनावली आहे.

वावंजे येथील मयत व्यक्तीच्या नावाचे बनावट आधार कार्ड बनवून त्या आधारे खरेदीखत तयार करून ते नावावर करून घेण्याच्या मोबदल्यात अभिजित पांडुरंग पाटील यांच्याकडून रक्कम स्वीकारली. ही फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात रघुनाथ कदम, भरत पाटील, दिलीप पाटील, शाकीर सिद्दिकी व मोहम्मद हरून आजीम मुल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या पाचही आरोपींना खांदेश्वर पोलिसांनी अटक केली. त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने चौघांना न्यायालयीन कोठडी आणि एका आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे.

राघो हरी पाटील यांचे मयत आजोबा गणपत हरी पाटील यांच्या नावे असलेली वावंजे गट क्रमांक १३८ या ठिकाणी जमीन आहे. यातील आरोपी रघुनाथ चंद्रराव कदम यांनी राघो हरी पाटील यांचे आजोबा गणपत हरी पाटील हे मयत असतानासुद्धा त्यांच्या नावाचे बनावट आधारकार्ड काढले व ते स्वतः म्हणजे गणपत पाटील असल्याचे साक्षीदार अभिजित पाटील यांना सांगून या जमिनीची त्यांना विक्री केली विक्रीपोटी असलेली रक्कम रघुनाथ, भरत, दिलीप, शाकीर व मोहम्मद हरून अजीम मुल्ला यांनी आपापसात वाटून घेतली.

भरत पाटील आणि दिलीप पाटील यांना माहिती असतानासुद्धा त्यांनी रघुनाथ कदम याला मदत करून आरोपींनी साक्षीदार म्हणून दस्तावर सह्या केल्या होत्या. त्यामुळे गुन्हा दाखल झाल्यानंतरया पाचही आरोपींना खांदेश्वर पोलिसांनी अटक केली.

## संपादकीय

# ...कालचा गोंधळ बरा होता!

विधिमंडळाच्या जागांसाठी शिक्षक-पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुका जाहीर झाल्यापासून सुरू झालेला सावळागोंधळ थांबायला तयार नाही आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे सैरावैरा धावणेदेखील सुरूच आहे. भाजपच्या नेत्यांनी लढवलेले डावपेच महाविकास आघाडीच्या नेत्यांना वेळेवर कळत नाहीत आणि कळले तरी त्याला तोंड देता येत नाही हे खरे सध्याचे राजकीय वास्तव आहे.

**गेल्या आठ वर्षांमध्ये जवळपास प्रत्येक निवडणुकीमध्ये दणकून मार खाल्ल्यानंतरदेखील काँग्रेसी संस्कृतीत मुरलेले नेते जागे व्हायला तयार नाहीत. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधान परिषदेच्या आमदारकी तसेच राज्यसभेच्या खासदारकीसाठी झालेल्या संघर्षामध्ये भारतीय जनता पक्षाने महाविकास आघाडीची केलेली दुर्दशा अजुनही लोकांना आठवत असेल. भाजपचे ज्येष्ठ नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुद्धिचातुर्याच्या जोरावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेला एकाच वेळी नामोहरम केले होते. तशाच प्रकारचे वातावरण सध्या शिक्षक-पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीबाबत निर्माण झाले आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारीचा अर्ज माघारी घेण्याची तारीख सोमवारी दुपारी उलटून गेली, परंतु महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये कोणाचा पाठिंबा कोणाला आहे हेच मुळात कळत नव्हते. नाशिक, नागपूर, औरंगाबाद, कोकण आणि अमरावती येथील शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुका होत आहेत. नाशिक मतदारसंघात काँग्रेसचे अधिकृत उमेदवार सुधीर तांबे यांच्या ऐवजी त्यांचे चिरंजीव सत्यजित तांबे यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला. पक्षाची अधिकृत उमेदवारी आपल्यालाच मिळणार असे जाहीरदेखील करून टाकले. भाजपनेच हा डाव टाकल्याचे काँग्रेसच्या नेत्यांच्या इतक्या उशीरा लक्षात आले की अखेर वेळ निघून गेली. तांबे पितापुत्रांचे निलंबन करण्यापलीकडे काँग्रेसला काहीही करता आले नाही. वास्तविक महाविकास आघाडीतील वाटाघाटींनुसार नाशिकची जागा काँग्रेसला आणि नागपुरची जागा शिवसेनेला दिली जाणार होती. प्रत्यक्षात घडले उलटेच. भाजपकडून उमेदवारी मिळत नाही हे पाहून शुभांगी पाटील यांनीच नाशिक मतदारसंघात आपला उमेदवारी अर्ज भरला आणि शिवसेनेचा पाठिंबा मिळवला. त्यातही घोळ आहेच. शुभांगी पाटील यांना पाठिंबा द्यायचा की सुभाष जंगले यांना पाठिंबा द्यायचा याबाबत ठाकरे गटातच मतभेद आहेत. नागपूरमध्ये अखेर भाजपचे अधिकृत उमेदवार नागो गाणार यांच्याविरोधात काँग्रेसने आता उमेदवार उभा केला आहे. औरंगाबादमध्येदेखील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला स्वपक्षातूनच होणाऱ्या विरोधाला तोंड द्यावे लागत आहे. महाविकास आघाडीतील हा घोळ ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनाही अखेर मान्य करावा लागला. अशा घोळामुळे महाविकास आघाडीतील विस्कळीतपणा उघड झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. विरोधकांच्या ऐक्यासाठी दरवेळी शिवसेना त्याग करणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. त्या इशाऱ्याकडे अर्थातच महाविकास आघाडीचे नेते सोयीस्कर दुर्लक्ष करतील यात शंका नाही. खासदार राऊत यांना त्यांचे विरोधक फारसे मनावर घेत नाहीत. तसेच महाविकास आघाडीचे नेतेदेखील त्यांच्यापासून दूरच राहतात. एवढा घोळात घोळ घडल्यानंतरदेखील प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले आमचे सर्व उमेदवार सहज विजयी होतील हे कशाच्या जोरावर सांगत आहेत हे त्यांचे तेच जाणोत. शिक्षक-पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीचे निकाल काय लागतील याबद्दल जनमानसात उत्सुकता आहे. तो निकाल लागायचा तो लागो, परंतु निवडणुकीआधीच महाविकास आघाडीतील तथाकथित 'ऐक्या'चा निकाल लागल्यात जमा आहे.**

# महाड शहर आणि परिसर होणार पुरापासून मुक्त



२२ जुलै २०२१ रोजी महाड शहर आणि परिसरात आलेल्या महापुरामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. त्याचबरोबर कोट्यवधी रुपयाची वित्तहानी झाली. भविष्यात पुन्हा महाडकारांवर नैसर्गिक आपत्ती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाय योजण्याचा प्रयत्न केले जात आहेत. यासाठी लागणारा निधी कमी पडणार नाही असे सरकारकडून सांगण्यात येत आहे. सावित्री काळ आणि गांधारी या तीन नदीपात्रातील गाळ काढण्यासंदर्भात शासकीय स्तरावर विविध उपाय योजले जात आहेत.

सावित्री, काळ आणि गांधारी या तीन नद्यांतून मागील वर्षी मोठ्या प्रमाणात गाळ काढण्यात आला असल्याची माहिती मिळाली असुन यावर्षीदेखील गाळ काढण्याचे काम सुरू राहणार आहे. मागील वर्षी सुमारे १० लाख क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला. यावर्षी त्यापेक्षा अधिक काळ काढण्यात येणार आहे. यासाठी यापेक्षा अधिक काळ काढण्यात येणार असून त्यासाठी सुमारे ३१ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. गाळ काढण्यासाठी जेव्हा निधी आवश्यक आहे त्याची पूर्तता पूर्ण करण्यासाठी परयाप्त आहे. जानेवारीपासून मे अखेरपर्यंत गाळ उत्खनन करण्याचे काम सुरू राहणार आहे. मागील वर्षी नांगलवाडी, शेडावनाका, वडवली या गावाजवळ असलेल्या नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात गाळ काढण्यात आला. यावर्षी केंबुर्लीपासून पुढे दासगाव पर्यंत वेगळ्या पद्धतीने गाळ काढण्यात येणार आहे दरवर्षी महाड शहर आणि परिसरातील गावांना पुराच्या पाण्याचा धोका निर्माण होतो. हा धोका कशामुळे होतो याबाबत तज्ज्ञांकडून पाहणी करण्यात आली असता विविध उपाय योजण्याचे सुचवण्यात आले आहे. त्यातील महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे नदीतील गाळ काढणे होय हेच काम मागील वर्षापासून तातडीने हाती घेतल्यामुळे थोड्याफार प्रमाणात पुराची तीव्रता कमी झाल्याचे दिसून आले असल्याचे नागरीक सांगत आहेत.



**खबरबात**
**महेश शिंदे**

शासकीय अधिकाऱ्यांच्या लहरीप्रमाणे हे काम होणार आहे. भविष्यात येणाऱ्या संभाव्य धोक्याचा विचार करून पूरनियंत्रणाचे काम करीत असल्याबद्दल आज जरी बोलले जात असले तरी अतिवृष्टीच्या दिवशी याची सत्यता कळणार आहे. गाळ काढण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावा लागत आहे, परंतु शहरात पुर आल्यानंतर नागरिकांचे होणारे नुकसान हे कधीही भरून निघणारे नसल्याने आता जो शासन स्तरावर खर्च होत आहे. तालुक्यातील काही गावे पूरबाधित असून अशा गावांना अन्य ठिकाणी स्थलांतरित करावे किंवा नाही याबाबत पाहणी करण्यात येत आहे. भविष्यामध्ये तालुक्यातील कोणालाही पुरापासून धोका निर्माण होणार नाही यासाठी सर्व प्रकारे प्रयत्न करीत असून विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः जातीने २०२१च्या पुरात खऱ्या अर्थाने प्रचंड काम केले आहे. त्यांचे हे योगदान महाडकर कधीच विसरणार नाहीत. सावित्रीचा घाळ काढण्याचा जसा फायदा महाडकरांना होणार आहे तसाच फायदा ठेकेदार आणि उच्च यांना होणार आहे. हे गणिज जर बिघल तर सावित्री चा जुट्यांसह गाळ काढणे हे दिवा स्वप्नच ठरेल.

# त्र्यंबकेश्वरची संत निवृत्तीनाथ महाराज यात्रा

एकादशी तिथीला उपवास करणे अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. आषाढी एकादशी यात्रा, कार्तिकी यात्रेला महाराष्ट्रात खास महत्व आहे. पौष वद्य षट्तिला एकादशीला श्री संत निवृत्तीनाथ महाराज यात्रेचे आयोजन केले जाते. या वर्षी १८ जानेवारी २०२३ रोजी षट्तिला एकादशी आहे. देवस्थानची पूजा, संत निवृत्तीनाथ महाराज समाधीची महापूजा होते. त्या नंतर लागलीच म्हणजे एकादशीला पहाटे तसेच पुन्हा नाथ समाधीची शासकीय महापुजेने यात्रा उत्सव सुरू होतो.

संत निवृत्तीनाथानी त्र्यंबकेश्वरी संजीवन समाधी घेतली. संत निवृत्तीनाथ महाराजाच्या समाधीला ७२३ वर्ष झाले आहेत. संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज समाधी सोहळा जेष्ठ महिन्यात पावसालयात झाला. परंतु यात्रा पौष कृष्ण एकादशीला भरते. कारण त्र्यंबकेश्वरला जेष्ठ वद्य १२ शके १२१९ या तिथीला संत निवृत्तीनाथ महाराजांनी संजीवनसमाधी घेतली थोडक्यात जून महिना व पाऊसाळा असे असताना यात्रा उत्सव पौष वद्य एकादशी या तिथीला भरवणे निर्णय तत्कालिन तेव्हाच्या संतांनी घेतला. श्री हरी पांडुरंगाची यात्रा पंढरपूर यात्रा आषाढात असते अशा वेळेस सर्व ठिकाणच्या सर्व संतांच्या दिंड्या पंढरपूर वाटचाल करीत असतात. ही पायी वाटचाल एक महिन्यापर्यंत सुरू असते. कार्तिकात आळंदी यात्रा असते अशी काही कारणे लक्षात घेऊन तत्कालीन संतांनी सातशे वर्षापूर्वी समाधी सोहळ्या नंतर संत निवृत्ती नाथ यात्रा पौष वारी पौष वद्य एकादशी ही तिथी यात्रेसाठी ठरवली असे सांगण्यात येते. तेव्हापासून यात्रा भरत असावी, तसेच १८३ वर्षपासून दिंडी प्रथा कागदावर आली त्यामुळे ही दिंडी सुरू होऊन १८३ वर्ष झाले असे बोलले जाते. या यात्रेनिमित्त पायी दिंड्या व वारकरी भाविक या लोक गंगेचा महापूर त्र्यंबकेश्वरकडे वळतो.



यंदा त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या पौषवारीनिमित्त राज्यभरातून वारकरी भाविकांच्या दिंडया त्र्यंबकमध्ये दाखल होत आहेत. दोन वर्षांनंतर वारकरी निवृत्तीनाथ भेटीचा सोहळा पार पडणार असून यासाठी त्र्यंबकेश्वर प्रशासन आणि निवृत्तीनाथ मंदिर प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. यात्रा काळात कानाकोपऱ्यातून दाखल झालेल्या वारकऱ्यांची कुठलीही गैरसोय होऊ नये, यासाठी देवस्थानच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. मानाच्या दिंड्यांसाठी राहुट्यांची व्यवस्था करण्यात येणार असून श्रीफळ प्रसाद देऊन त्यांचे स्वागत करण्यात येणार आहे, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष निलेश तुकाराम गाढवे यांनी दिली.

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपवर येणारा 'हा' व्हिडीओ पाहणे महागात



व्हॉट्सॲप वापरताना अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करताना अनेकदा युझरकडून चुका होत असतात. पण एक चूक किती महागात पडू शकते याचाही युझरला अंदाज नसतो. त्यामुळे व्हॉट्सॲपबाबतही वापर करताना काळजी बाळगणे महत्त्वाचे आहे. व्हॉट्सॲपवर अशाच काही व्हिडीओ शेअर किंवा फॉरवर्ड करणे किती महागात पडू शकते याची माहिती आपण आज घेणार आहोत.

व्हॉट्सॲप वापरत असताना तुम्ही पोर्नोग्राफी असलेला कोणताही व्हिडीओ शेअर करणे टाळावे. विशेषतः चाइल्ड पोर्नोग्राफी हा असा विषय आहे, ज्यावर तुम्ही तुरुंगातही जाऊ शकता. कारण असे करणे कायद्याच्या गुन्ह्याच्या श्रेणीत येते. जेव्हा तुम्हाला असा व्हिडीओ मिळेल तेव्हा स्थानिक पोलिसांना त्याची माहिती द्या. अनेक वेळा आपण त्याकडे दुर्लक्ष करतो, जे नंतर खूप त्रासदायक ठरू शकते.


फेक न्यूज शेअर करणेही तुम्हाला महागात पडू शकते. जर तुम्हाला असा कोणताही व्हिडीओ प्राप्त झाला ज्यामध्ये तुमच्यासोबत चुकीची किंवा खोटी बातमी शेअर केली गेली असेल तर तुम्ही तो त्वरित हटवा. तसेच, तुम्ही ते अजिबात फॉरवर्ड करू नये. कारण असे केल्यास कायद्याच्या कचाट्यात सापडू शकते. कारण खोट्या बातम्यांना आळा घालण्यासाठी व्हॉट्सॲपही सतत काम करत आहे.

जर तुम्ही व्हॉट्सॲपवर एखाद्याचा खासगी व्हिडीओ शेअर केला तर महागात पडू शकते. कारण असे करणेदेखील बेकायदेशीर मानले जाते. म्हणूनच जर तुम्हाला एखाद्याचा व्हिडीओ आला असेल तर तो असा शेअर करू नये. विशेषतः एक व्हिडीओ ज्यावर कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. म्हणूनच जेव्हा जेव्हा तुम्हाला कोणाचा खासगी व्हिडीओ येतो तेव्हा तो त्वरित हटवला पाहिजे. व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी थोडी काळजी घ्यावी.

# गणितज्ञ दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर

गणितज्ञ दत्तात्रेय कापरेकरांच्या आयुष्यात त्यांच्या वाटेला फक्त आणि फक्त अवहेलना आली, त्यांचे एक-दोन प्रबंध काही गणितांच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले, मात्र इतर सगळे नाकारले गेले. नाराज न होता कापरेकर आपले संशोधन नाशिकच्या साध्या प्रेसमधून छापून लोकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये वाटायचे. शहरी गणितज्ञ त्यांच्या शोधांची खिल्ली उडवायचे, मात्र कापरेकरांचे निधन झाल्यावर या सगळ्यांना त्यांच्या शोधांची महती व महत्त्व समजले.

गणितज्ञ म्हटला की, आपल्याला आठवतो दीर्घ आकडेमोड करत गणितातल्या उच्च पदव्या घेणारा विदेशातून शिकून आलेला एखादा स्मार्ट माणूस, जर आठवण काढायचीच झाली, तर आर्यभटापासून ते श्रीनिवास रामानुजन यांच्यापर्यंत सगळ्यांबद्दल लोक लिहितील व वाचतीलही, पण आज आपण महाराष्ट्राच्या मातीला स्पर्श करणार आहोत. आपल्याला सांगणार आहोत एका मराठमोळ्या शाळामास्तरबद्दल ज्यांनी गणितातले उच्चशिक्षण घेतले नसतानाही कित्येक शोध लावले, त्यांच्या शोधांमुळे व कष्टाने त्यांना 'गणितानंद' ही उपाधी मिळाली, पण मराठी माणूस आज त्यांना पूर्णपणे विसरलाय.



**निमित्त**

१७ जानेवारी १९०५ रोजी डहाणू येथे जन्म झालेल्या या माणसाचे नाव होते दत्तात्रय रामचंद्र कापरेकर, वडील कारकून, त्यात वडिलांना ज्योतिषाचा अभ्यास करण्याची हौस होती, ज्योतिषात करावी लागते तितकी आकडेमोड वडिलांनी दत्तात्रयला शिकवलेली, पण दत्तात्रयाला तीच आवडली व त्याने तीच आकडेमोड आयुष्यभर केली. पुढे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजला पदवी घेत असताना, त्यांनी रँग्लर परांजपे ॲवॉर्ड मिळवले. जे गणिताच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याला मिळायचे. बी.एस्सी. ची पदवी घेताच, कापरेकर नाशिकजवळच्या देवळाली येथे शाळामास्तर म्हणून रुजू झाले ते आयुष्याच्या अखेरपर्यंत तिथेच राहिले. कापरेकरांच्या आयुष्यात त्यांच्या वाटेला फक्त आणि फक्त अवहेलना आली, त्यांचे एक-दोन प्रबंध काही गणितांच्या जर्नल्समध्ये प्रकाशित झाले, मात्र इतर सगळे नाकारले गेले. नाराज न होता कापरेकर आपले संशोधन नाशिकच्या साध्या प्रेसमधून छापून लोकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये वाटायचे. शहरी गणितज्ञ त्यांच्या शोधांची खिल्ली उडवायचे मात्र कापरेकरांचे निधन झाल्यावर या सगळ्यांना त्यांच्या शोधांची महती व महत्त्व समजले.

कापरेकरांचे संशोधन काळाच्या खूप पुढे होते, नंबर थिअरी म्हणून आज जिचा गवगवा आहे त्यातले कित्येक मूलभूत शोध कापरेकरांनी स्वतंत्ररीत्या लावले होते. त्यांनी लिहिलेल्या लेखांची मग पारायणे झाली, उजळण्या झाल्या. त्यांच्या लेखांवर कित्येक गणितज्ञ लोकांनी पीएच.डी. केल्या. 'माणूस मरावा अन् मग त्याची किंमत कळावी' हे कापरेकरांच्या बाबतीत खरंच घडले होते.

आता पाहूया दत्तात्रय रामचंद्र कापरेकरांचे काही खास शोध, त्यानिमित्ताने तुमच्या गणिताची उजळणीही होऊन जाईल. कापरेकर कॉन्स्टंट : ६१७४ ही संख्या कापरेकर कॉन्स्टंट म्हणून आज ओळखली जाते. तुम्ही कुठलीही चार अंकी संख्या गृहीत धरा, समजा आपण ४६३७ ही संख्या गृहीत धरू, आता या संख्येतील आकडे एकदा असे मांडा की, संख्या शक्य तितकी मोठी होईल व एकदा असे मांडा की संख्या शक्य तितकी लहान होईल. म्हणजे मोठी संख्या होईल ७६४३ आणि लहान संख्या ३४६७. आता लहान संख्या मोठ्या संख्येतून वजा करा, तुम्हाला मिळेल ४१६७, आता ही संख्या (४१६७) कापरेकर पद्धतीने मांडून पुन्हा मोठ्या संख्येतून लहान संख्या वजा करा. (७६४१-१४६७) तुम्हाला मिळेल ६१४७ अर्थात कापरेकर कॉन्स्टंट.

तुम्ही जगातली कुठलीही चार अंकी संख्या घेऊन हा प्रयोग करू शकता, त्यांचे उत्तर हे एकतर शून्य येईल किंवा कापरेकर कॉन्स्टंट ६१४७. अचाट शोध लावणाऱ्या कापरेकरांचे आयुष्य मात्र हलाखीतच गेले, म्हातारपणी पेन्शन अपुरी पडू लागल्यावर त्यांना गणिताच्या शिकवण्या घ्याव्या लागल्या. १९५३ साली स्क्रिप्टा मॅथेमॅटिका या जर्नलमध्ये त्यांचा शोधनिबंध प्रकाशित झाला होता. ती जगाने घेतलेली त्यांची दखल होती. अखेर मार्टिन गार्डनर नावाच्या प्रसिद्ध गणितज्ञाने १९७५ साली सायंटिफिक अमेरिकन या जागतिक कीर्तीच्या विज्ञान मासिकात कापरेकरांच्या कामाबद्दल लिहिले.

**-अजय महाडिक**

**क्लिक...क्लिक...!**




**सुधागड : रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य वातावरणात राहणे अनेक जण पसंत करतात. यामुळे जिल्ह्यात बहुसंख्येने फार्महाऊस निर्माण झाले असून त्याच्या सभोवताली गार्डन, बागेला महत्त्व आहे. यासाठी सध्या झेन गार्डनला विशेष पसंती दिली जाते. पाली-खोपोली राज्य महामार्गावर परळी येथील हॉटेल लँडमार्क येथे नुकतीच या गार्डनची निर्मिती करण्यात आली आहे.**

## आरोग्य प्रहर

# तिळाचे लाडू खाल्ल्याने 'हे' पाच आजार होतील दूर

मकर संक्रांत आणि लोहरी सारख्या सणांदरम्यान खाण्या-पिण्याची खूप रेलचेल असते. आजही, भारतातील बहुतांश घरांमध्ये, लोक सणासुदीच्या काळात पारंपारिक पद्धतीने तिळगूळ, खिचडी व इतर पदार्थ बनवून खातात. हिवाळ्याच्या दिवसात तिळाचे लाडू खाणे आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. हे लाडू अतिशय आरोग्यदायी असून त्यात अनेक जीवनसत्वं असतात. तीळ आणि गूळ घालून तयार केलेले लाडू हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवण्याचे काम करतात. शरीराला बरे करण्यासोबतच तिळापासून शरीराला इतरही अनेक फायदे मिळतात. जाणून घ्या हिवाळ्यात तीळ खाण्याचे काय फायदे आहेत ते जाणून घ्या.



**तिळाच्या लाडवामध्ये अनेक पोषक तत्वे**

तिळात लोह, प्रथिने, व्हिटॅमिन बी आणि ई आढळतात. हे सर्व घटक डोळे, यकृत आणि इतर अवयवांसाठी फायदेशीर आहेत. तुम्ही काळ्या किंवा पांढर्या तिळाचे लाडू तयार करू शकता. तीळ हे हेल्दी सुपरफूड आहे आणि या कारणास्तव त्याचे तेलही सेवन करता येते. तिळगुळामध्ये वापरण्यात येणाऱ्या गुळामुळे आपले रक्ताभिसरण सुधारते. हिवाळ्यात रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, गुळामुळे त्या प्रसरण पावतात आणि रक्तप्रवाह सुधारतो. हे लो कॅलरी फूड असल्याने वजन कमी करणारे लोकही त्याचे सेवन करू शकतात.

**तिळगूळाच्या सेवनाने हे पाच आजार राहतील दूर**

१) हिवाळ्यात तिळाचे लाडू खाण्याचा सल्ला दिला जातो कारण ते आपली रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. तसेच खोकला आणि सर्दीपासून सुरक्षित ठेवतात.

२) या लाडवांमध्ये कॅल्शिअम असल्यामुळे हाडं मजबूत होतात व हाडांच्या दुखण्याचा त्रास होत नाही.

३) बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या लोकांनी हिवाळ्यात तिळाचे लाडू जरूर खावे, कारण त्यात फायबरदेखील असते.

४) तिळाचे लाडू हे ऊर्जा देण्यासाठी प्रभावी आहे. तसेच दम्याच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर आहेत.

५) हिवाळ्यात हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका अधिक येतो. अशा परिस्थितीत तिळाचे सेवन केले पाहिजे कारण त्यातील घटक आपल्या शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवतात.

# वाहतूक पोलिसांसमोर दंड वसुलीचे आव्हान

## रायगडात तब्बल सात कोटी ४५ लाख रुपये थकीत




**अलिबाग : प्रतिनिधी**

ई चलन पध्दतीमुळे दंड थकविण्याचे प्रमाण वाढले आहे. रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून दंडाचे ७ कोटी ४५ लाख रुपये थकीत आहेत. ते वसूल करण्याचे आव्हान रायगड पोलीस दलाच्या वाहतूक विभागासमोर आहे. ही सर्व थकीत दंडाची प्रकरणे न्यायालयात नेण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.

रायगड जिल्ह्यात २०२२ या वर्षात १ लाख ४८ हजार ५९४ जणांना वाहतुक नियम मोडल्या प्रकरणी चलन जारी करण्यात आले आहे. त्यांच्याकडून ९ कोटी ५७ लाख २९ हजार रुपयांचा दंड वसूल होणे अपेक्षित होते. यापैकी २ कोटी ११ लाख ४८ हजार २०० रुपयांचा दंड प्रत्यक्ष जमा झाला आहे. ७ कोटी ४५ लाख ८१ हजार ७५० रुपयांची दंड वसूली शिल्लक आहे.वाहतूक पोलिसांच्या कारवाईत पारदर्शकता यावी, तसेच नियम मोडणाऱ्यांकडून तातडीने दंड वसूल न करता ई चलन पध्दतीने व्हावी. दंड थेट बँक खात्यात जमा व्हावा यासारख्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. मात्र या सुधारणाच आता वाहतूक पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरू लागल्या आहेत. ई चलन पध्दतीमुळे दंड थकविण्याचे प्रमाण वाढले आहे. ई चलन पध्दतीमुळे वाहतूक नियम मोडणाऱ्यांमध्ये बेपर्वाई वाढली असून दंड भरला नाही तरी काही होत नसल्याची मानसिकता तयार होत असल्याचे यावरून दिसून येत आहे. त्यामुळे ही सर्व प्रकरणे न्यायालयात नेण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.चलन मिळाल्यानंतर सात दिवसाच्या आत दंडाची रक्कम भरणे आवश्यक असते. मात्र ती भरली जात नसल्याने पुढील कारवाईसाठी ही प्रकरणे न्यायालयात दाखल केली जात आहेत. त्याचबरोबर लोकन्यायालयातही या प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी तयारी सुरु केली आहे.

# साळाव नाका येथे दुचाकीला अपघात

**एक ठार, एक गंभीर**



**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव नाका येथे भरधाव मोटर सायकलचे नियत्रंण सुटल्याने अपघात घडून त्यामध्ये एक ठार व एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.

मुरूड–साळाव मार्गे रोहा रस्त्याने चेहेर गावाकडे टि.व्हि. एस. स्टार सीटी एम.एच. ०६/एडी/७४२८ क्रमांकाच्या मोटर सायकलने रविवार (दि.१५) पावणेचारच्या सुमारास चालक मदनकुमार कन्हाई रजक वय ४० वर्ष, रा. पिंपरा, बगाही, औरगांबाद, बिहार सध्या रा. साळाव बिर्ला मंदिर नजीक चाळ यांनी जयेंद्र मधूकर माळी रा. चेहेर, ता. मुरूड यांना डबलसीट घेऊन जात होते. साळाव नाका येथील वळणावर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने व हयगईने बेदरकारपणे भरधाव वेगात धोकादायक पध्दतीने मोटरसायकल चालवित असताना, मोटर सायकलचा ताबा सुटून मोटर सायकलने रस्त्याचे बाजूच्या कठड्याला जोरदार ठोकर मारली.

या अपघातात चालक मदनकुमार कन्हाई व डबलसीट बसलले जयेंद्र माळी कठड्याच्या बाजूला असलेल्या हलडे यांचे घराचे मागील छतावर जाऊन आढळले. यामध्ये चालक मदनकुमार कन्हाई यांचे डोक्याला गंभीर दुखापत होऊन ते ठार झाले व मागील डबलशीट बसलेल जयेंद्र माळी गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात मोटरसायकलचे मोठे नुकसान झाले तर जखमीस ताबडतोब रूग्णालयाकडे नेण्यात आले. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे मोटर वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे भा.द.वि.सं.क ३०४(अ) २७९,३३७,३३८ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून याबाबत फिर्याद रवींद्र मधूकर माळी रा. चेहेर यांनी दिली आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाणे पो.नि. मुपडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भोईर करत आहेत.

# भाजप नेत्या निलीमा भोसले यांच्या संकल्पनेतून तिळगूळ वाटप



**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरात लोकांमधील स्नेह भाव वाढावा या हतूने नवेनगर येथे भाजपच्या नेत्या निलीमा भोसले यांच्या संकल्पनेतून घरोघरी तिळगुळाचे वाटप करण्यात आले.

आजच्या राजकीय परिस्थितीचा समाज मनावर मोठा प्रभाव पडत आहे. यामुळे लोक एकमेकांपासून दूर होऊ लागली आहेत. राजकीय श्रेयवादात ही दरी वाढत चालली आहे. समाजात जाती जाती आणि धर्मांमध्ये तेढ निर्माण होऊ लागले आहे. हे तेढ कमी करुन लोकांमध्ये स्नेह भाव वाढावा या हेतूने भाजपाच्या महिला आघाडी उपाध्यक्षा निलीमा भोसले यांच्या संकल्पनेतून घरोघरी तिळगुळाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहराध्यक्ष निलेश तळवटकर, कामगार सेलचे अमोल सुंभे, उपतालुकाध्यक्ष चंद्रजित पालांडे, वाहतुकसेलचे विजय जाधव, युवा मोर्चाचे सुमेध भोसले, विद्यार्थी परिषदेचे विश्वतेज भोसले, धाडवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# रेल्वे अपघातात तरुणाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत मुंबई रेल्वेमार्गावरील वांगणी रेल्वेस्थानकापासून काही अंतरावर रेल्वे पोलिसांना एक जखमी तरुण आढळून आल्याने त्याला पोलिसांनी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या तरुणाचे वय सुमारे २५ वर्ष असून उंची ४.५ इंच, अंगाने सडपातळ, रंगाने गहूवर्ण, चेहरा उभट असा आहे. १० जानेवारीला हा तरुण आढळून आला. या तरुणाची अद्यापि ओळख पटलेली नाही. याबाबत कोणाला काही माहिती असल्यास कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा तसेच पो ह कांबळे ,पोलीस नाईक गांगुर्डे यांच्याशी संपर्क साधावा. असे कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ए. आर. शिंदे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# भूमिपुत्र सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन साजरा




**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील विठ्ठलवाडी गावातील तरुण मंडळींनी एकत्र येऊन लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त १३ जानेवारी २०२२ रोजी गावातील समस्येवर मात करण्यासाठी राजकारण विरहीत भुमिपुत्र सामाजीक विकास संस्था विठ्ठलवाडीची स्थापना केली. या संस्थेचा प्रथम वर्धापन दिन १३ जानेवारी रोजी साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापनचे जयवंत गायकवाड, पाणी व स्वछता मिशन कक्ष रायगड जि. प. सर्वेश तरे, बांधकाम व्यवसायिक मंगेश म्हात्रे, जीवन म्हात्रे, प्रदिप वर्तक, अँड. नंदू म्हात्रे, अँड. महेंद्र म्हात्रे, सुनील म्हात्रे, पूजा पाटील, ग्रा. सदस्य रोहिदास म्हात्रे, रवींद्र पाटील, संजीव म्हात्रे, म.वा.म्हात्रे गुरुजी, उत्तम म्हात्रे उपस्थित होते. अल्पावधीतच भुमिपुत्र सामाजिक विकास संस्थेचे नाव गगनावर झळकताना दिसणार आहे असे प्रमुख पाहुणे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

भुमिपुत्र सामाजीक विकास संस्था उदयास आल्यापासून संस्थेने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी पुढाकार घेतला गावातील महत्वाची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी यशस्वी हातभार लावून श्री विठ्ठल देवस्थानाच्या मंदिराचे व कळसाचे रंग – रांगोटीचे तसेच मंदिरावर चढण्यासाठी स्टीलच्या जिन्याचे व स्लॅबचे काम करून भुमिपुत्र सामाजीक विकास संघटनेने आपल्या एकजूटीचा श्री गणेशा केला असल्याचे माहिती यावेळी देण्यात आली. वर्धापनदिनाचे औचित्य साधून संस्थेमार्फत मोतीबिंदू शिबीर, वृक्षारोपण, शहिदांना श्रद्धांजली, दहावी, बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार कोळीगित असे अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सूत्रसंचालन व आभार प्रेमाचंद म्हात्रे यांनी केले आणि प्रस्तावना सचिव कल्पेश म्हात्रे यांनी केली.

# महाडमधील महिला नृत्य स्पर्धांना उदंड प्रतिसाद

## संस्कृती ग्रुपची कलाकारांना पर्वणी; समूह डान्समध्ये 'हिरकणी'चे आदिवासी नृत्य सरस





**महाड : प्रतिनिधी**

मागील बारा वर्षापासून महाड शहर व परिसरातील विवाहित असणाऱ्या महिलांसाठी सांस्कृतिक क्षेत्रातील विविध स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संस्कृती ग्रुपने शनिवारी आयोजित केलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये झालेल्या महिला नृत्य स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला.

यामध्ये ग्रुप डान्स स्पर्धेत हिरकणी ग्रुपने सादर केलेल्या आदिवासी नृत्याला प्रथम तर ड्यूएट साँगमध्ये शर्वरी जाधव, श्रुतिका शिरशिवकर यांनी सादर केलेला छम्मक छल्लो गाण्यास तर सोलो प्रकारामध्ये पुनम जाधव यांनी सादर केलेल्या परमसुंदरी अविष्कारास सर्वप्रथम पुरस्कार मिळाला.

मागील दोन वर्षाच्या कोरोना महामारीच्या काळामध्ये या स्पर्धा होऊ शकल्या नव्हत्या. मागील बारा वर्षापासून महाड शहरातील विविध क्षेत्रांतील कार्यरत असणाऱ्या मानसी मराठे, शीला साबळे, सपना बुटाला, अनिता पार्टे, डॉक्टर संध्या बुटाला, रश्मी शेठ, स्मिता तलाठी, या सात महिलांनी एकत्र येऊन शहरांतील विवाहित महिलांसाठी दांडिया, रांगोळी, पाककला, अंताक्षरी तसेच रंगपंचमी महोत्सवाचे आयोजन सातत्यपूर्ण पद्धतीने सुरू ठेवले आहे. मागील दोन वर्षाच्या महामारी संकटानंतर शनिवारी सायंकाळी आयोजित केलेल्या भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील या स्पर्धांना शहरातील महिलांनी भरभरून उदंड प्रतिसाद दिला.

शनिवार १४ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसात वाजता सुरू झालेल्या या स्पर्धा रात्री बारापर्यंत सुरू होत्या. तीन नृत्य प्रकारामध्ये या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ग्रुप डान्स प्रकारात आदिवासी नृत्य सादर करणारे हिरकणी ग्रुपला प्रथम तर ओम शांती ओम या रेट्रो रॉकर्स ग्रुपला द्वितीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

ड्युएट साँगमध्ये 'छम्मक छल्लो' सादर करणाऱ्या शर्वरी जाधव व श्रुती शिरशिवकर यांना सर्वप्रथम तर 'कोई शहरी बाबू'करिता स्नेहल चांडवेकर व कोमल मोहिते यांना द्वितीय तर 'डफलीवाले' नृत्यप्रकारासाठी कीर्ती गुजराती व तेजश्री शेठ यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. सोलो नृत्य प्रकारामध्ये पुनम जाधव यांना' परम सुंदरी 'करिता प्रथम क्रमांक गौरी पार्टे यांना 'लावणी' नृत्यासाठी द्वितीय क्रमांक अश्विनी मोरे यांना' हमको आजकल' करिता तृतीय तर रेखा मुळे यांना 'मुंगडा' प्रकारासाठी सन्मानित करण्यात आले. या तीन प्रकार पैकी ग्रुप डान्ससाठी प्रथम, द्वितीय, क्रमांकासाठी ७ हजार व ५ हजार रुपये रोख व आकर्षक चषक ठेवण्यात आला होता तर डुएट साँग व सोलोकरिता ७ हजार ५ हजार व तीन हजार रुपयांची रोख बक्षीसासह आकर्षक चषक देऊन महाडमधील अस्मिता शिंदे, वैशाली दोसी, पूजा जगताप, डॉक्टर मंजुषा कुद्रीमोती व संध्या नारखेडे प्रकल्प अधिकारी बार्टी या मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

नृत्य स्पर्धेसाठी मुंबई येथून गायत्री दीक्षित व स्मिता तलाठी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. मागील दोन वर्षानंतर झालेल्या या स्पर्धांना शहरातील महिलांनी दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल संस्कृती ग्रुपच्या वतीने सर्व महिलांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# टीडब्ल्यूजे नाट्यमहोत्सवात माणगाव संघाचे वर्चस्व




**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावसहीत महाराष्ट्रात इतर २० ठिकाणी शाखा असलेल्या टीडब्ल्यूजे या कंपनीचा वार्षिक नाट्यमहोत्सव माणगाव येथे शनिवार (दि.१४) रोजी पार पडला. महोत्सवात कंपनीच्या कर्मचारी कलाकारांनी विविध कलागुण सादर केले.

शेअर मार्केट प्रशिक्षण, बांधकाम, इव्हेंट मॅनेजमेंट, मीडिया, हॉस्पिटॅलिटी,माहीती तंत्रज्ञान, समाज सेवा, बिझनेस कन्सल्टन्सी, लॉजीस्टिक्स या क्षेत्रात टीडब्ल्यूजे गेली चार वर्षे आपली सेवा देत आहे. टीडब्ल्यूजेने आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये नेतृत्वकौशल्य, संघभावना वाढीस लागावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी झेस्ट २०२३ चे आयोजन केले होते. त्याचाच एक भाग म्हणून नाट्यमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या नाट्यमहोत्सवामध्ये स्किट, मुकनाट्य, एकपात्री अभिनय, नकला असे विविध नाट्यप्रकार सादर करण्यात आले. या स्पर्धेसाठी टीडब्ल्यूजेच्या महाराष्ट्रातील २० शाखांमधील ठाणे, चिपळूण, यवतमाळ, खारघर, सांगली, माणगाव , पुणे येथील संघांनी सहभाग घेतला होता. यावेळी टीडब्ल्यूजेचे संचालक समीर नार्वेकर, नेहा नार्वेकर, तसेच टीडब्ल्यूजे ग्रुपच्या संचालक मंडळातील अमित बालम, मुनाफ मुकादम, स्वप्नील पवार, सिद्धेश पाटील उपस्थित होते. कंपनीच्या या नाट्यस्पर्धांमधील प्रहसन नाट्यप्रकारात माणगाव टीम १ने प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक, खारघर संघाने द्वितीय क्रमांकाचे रजत पदक, चिपळूण संघाने तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक तर माणगाव टीम २ने उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. मुकनाट्य प्रकारात माणगाव टीम १ ने प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक, माणगाव टीम २ ने द्वितीय क्रमांकाचे रजत पदक, चिपळूण संघाने तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक तर ठाणे संघाने उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले.एकपात्री अभिनय नाट्यप्रकारात समीर देसाई (माणगाव) यांनी प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक, अनिकेत वायदंडे(पुणे) यांनी द्वितीय क्रमांकाचे रजत पदक, शुभम गोरे (पुणे) यांनी तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक तर सौरभ भालेकर (ठाणे) यांनी उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले.मिमिक्री नाट्यप्रकारात जावेद मुल्ला (माणगाव)यांनी प्रथम क्रमांकाचे सुवर्ण पदक, अनिकेत वायदंडे (पुणे) यांनी द्वितीय क्रमांकाचे रजत पदक, चेतन मोरजे (खारघर) यांनी तृतीय क्रमांकाचे कांस्य पदक तर सौरभ भालेकर (ठाणे) यांनी उत्तेजनार्थ बक्षीस पटकाविले. या स्पर्धेचे माणगाव येथील संगणक तज्ज्ञ डॉ. अजय मोरे,शिक्षिका सायरबानू चौगुले, शिक्षिका विनया जाधव आणि शिक्षक अजित शेडगे यांनी परीक्षक म्हणून उत्तम प्रकारे काम पाहिले. सर्व विजेत्यांना कंपनीचे पदाधिकारी व परीक्षकांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# खोपोलीत सुसज्ज गार्डन उभारण्याची शिळफाटा ग्रामस्थांची आमदारांकडे मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे खोपोलीतील शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीची नासधूस झाली. मोक्याची जागा हडप होण्याची भीती असल्यामुळे विश्रामगृहाची जागा खोपोली नगर परिषदेस हस्तांतरीत करून सुसज्ञ मोठ गार्डन उभारा या मागणीचे निवेदन पत्र आमदार महेंद्र थोरवे यांना शिळफाटा ग्रामस्थांनी दिले आहे.

शनिवारी आमदार महेंद्र थोरवे खोपोली येथे आले होते. शिळफाटा येथील ग्रामस्थांनी शासकीय विश्रामगृह येथे भेट घेवून निवेदन दिले. यावेळी आरपीआयपक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक, नंदूशेठ ओसवाल,सागर पवार, सुरेखा खेडेकर, प्रसाद वाडकर, मोहन केदार, किशोर अवल, किशोर असावले,सुरेश घोडके,सिद्धार्थ गायकवाड, गजानन महाडिक,अरुण सदाफुले, राजा देशमुख, तुषार खोपे, मुन्नावर अंसार, प्रविण महाडिक, राजेश पवार, विनायक यादव, संतोष मोहिते, गौरव पाटील, श्रीकांत आठवले, चिराग रावळ, निहाल गायकवाड, लखन पवार उपस्थित होते.

मुंबई पुणे शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या खालापूर तालुक्याला राष्ट्रीय महामार्ग खेटून गेला आणि विकासाचा मार्ग मोकळा होत गेला. ब्रिटीशानी मुंबई पूणे महामार्ग तयार करताना बोरघाटाचा अवघड टप्पा, खंडाळा बोगदा तयार करताना मुक्कामासाठी खोपोलीची निवड केली होती. त्यावेळी ब्रिटीश अधिकाऱ्यांना विश्रांतीसाठी डाक बंगला तयार करण्यात आले होते. मुंबई पूणे राष्ट्रीय महामार्गाला लगत मोक्याच्या ठिकाणी अडीच एकर जागेत सध्याचे विश्रामगृह आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असलेल विश्रामगृहाची सध्या अतिशय दुरावस्था झाली आहे.विश्रामगृहाची संरक्षक भिंत ढासळलेली आहे. याशिवाय विश्रामगृह परिसर पूर्णपणे पालापाचोळा आणि कचऱ्याने भरून गेला आहे. याठिकाणी खानसामा, सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळेस या इमारतीचा गैरवापर होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील विश्रामगृह मरणासन्न अवस्थेत असल्याचे शिळफाट्यावरील नागरिकांसाठी आणि बच्चे कंपनीसाठी गार्डन तयार करावा, अशी प्रतिक्रिया आरपीआयपक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक यांनी दिली.

# नवी मुंबईच्या सुशोभिकरणात कल्पकतेचे दर्शन

## प्रवाशांसह पर्यटकांकडून कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर स्वच्छतेमध्ये देशात तृतीय व राज्यात प्रथम क्रमांकाचे उल्लेखनीय शहर म्हणून नावाजल्या जात असलेल्या नवी मुंबईतील लक्षवेधी शहर सुशोभिकरण हा देखील नवी मुंबईकर नागरिकांच्या व नवी मुंबईला भेटी देणाऱ्या पर्यटकांच्या तसेच नवी मुंबईतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या कौतुकाचा विषय आहे. नवी मुंबई शहरात प्रवेश केल्यानंतर डोळ्यांना सुखावणाऱ्या रंगसंगतीने सजलेल्या चित्राकृती, विविधांगी शिल्पे, सुशोभित वाहतुक बेटे यामुळे मनाला आल्हाददायक, सुखावह वाटते, अशी भावना विविध क्षेत्रातील मान्यवरांप्रमाणेच सर्वसामान्य नागरिकही विविध पातळ्यांवरून व्यक्त करीत असतात.

यावर्षी स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ला सामोरे जात असताना निश्चय केला-नंबर पहिला हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून शहर स्वच्छतेप्रमाणेच सुशोभिकरणाच्या अधिक वेगळ्या संकल्पना राबविण्यावर भर दिला जात असल्याचे नवी मुंबईतील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या कामांमधून दिसून येत आहे.

मागील वर्षी साकारलेल्या भित्तीचित्रांची पावसाळ्यासह इतर ऋतुंमुळे झालेली स्थिती लक्षात घेऊन त्यानुसार त्याची आवश्यक डागडुजी करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आलेले आहेत. यामध्ये ज्या चित्रभिंती चांगल्या स्थितीत आहेत त्या धुवून स्वच्छ करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी रंग धुसर वा पुसट झालेले आहेत त्याठिकाणी रंगाचे आणखी एक लेपन करण्याच्या सूचनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. याशिवाय जी चित्रे पाण्यामुळे शेवाळ साचून खराब झालेली आहेत त्याठिकाणी नवीन रंगसंगतीसह नाविन्यपूर्ण चित्रे रेखाटली जात आहेत.




ही नवीन चित्रे काढताना त्यामध्ये कला, संस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता अशा विविध बाबींविषयी कोणताही संदेश न लिहिता चित्रांच्या माध्यमातून जनजागृतीपर संदेश प्रसारण होईल अशाप्रकारे कल्पक संकल्पना चितारल्या जात आहेत. यावर्षी काही चित्रभिंती विविध संतांच्या समाजजागृती करणाऱ्या ओव्या, अभंग व वचनांनी सजणार असून त्यासोबतच नामवंत साहित्यिकांच्या जीवनाला प्रेरणा देणाऱ्या काव्यपंक्तीही काही ठिकाणी अनुरुप चित्रांसह सुलेखनांकित करण्यात येणार आहेत.

या वर्षीही जेजे स्कुल ऑफ आर्ट्स, रचना संसद कला महाविद्यालय, रहेजा स्कुल ऑफ आर्टस अशा नामांकित कला महाविद्यालयांचे विद्यार्थी नाविन्यपूर्ण संकल्पना घेऊन नवी मुंबईचे चित्र बदलण्यासाठी ब्रश हातात घेऊन कामाला लागले असून त्यांच्यासोबत नवी मुंबईतील उत्तम व्यावसायिक चित्रकारही आपले कलात्मक रंग भरत आहेत. साधारणत: ६५० हून अधिक विद्यार्थी व कलावंत चित्रकार नवी मुंबईत ठिकठिकाणी आपले चित्रकलाप्रदर्शन घडवित असून त्यामध्ये १५० हून अधिक विद्यार्थिनी, महिला चित्रकारांचा समावेश आहे.

### स्वच्छ सर्वेक्षणासाठी कलाकारी फायदेशीर

स्वच्छ व सुंदर नवी मुंबई ही ओळख नव्या स्वरुपातील आकर्षक भित्तीचित्रांद्वारे तसेच सुशोभिकरणाद्वारे नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून लक्षवेधी केली जात आहे. त्यामुळे नागरिकांकडून नवी मुंबईच्या या नव्या रुपाची प्रशंसा केली जात आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२३मध्ये देशातील प्रथम क्रमांकाच्या शहराच्या उद्दिष्टपूर्तीसाठीही शहर सुशोभिकरण हा एक महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

# मुलाच्या वाढदिवशीच रिक्षाचालकाचा अपघाती मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा एमआयडीसीतील यादव नगरमध्ये राहणाऱ्या एका रिक्षाचालकाचा मुलाच्या वाढदिवशीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री एमआयडीसी रोडवर घडली. विकास पन्नालाल सरोज (वय ३४) असे या रिक्षाचालकाचे नाव असून मुलाच्या वाढदिवसाचा केक कापून तो मित्राला सोडण्यासाठी रिक्षा घेऊन गेला होता.


या वेळी त्याचे भरधाव रिक्षावरील नियंत्रण सुटल्याने ही रिक्षा दुभाजकावर धडकून त्याचा मृत्यू झाला. या अपघाताला स्वत: विकास सरोज जबाबदार असल्याचे आढळून आल्याने रबाळे एमआयडीसी पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात मृत झालेला रिक्षाचालक विकास सरोज दिघा एमआयडीसीतील यादव नगर परिसरात पत्नी व दोन मुलांसह राहात होता.

मंगळवारी विकासच्या मुलाचा वाढदिवस असल्याने तो रात्री मुलाच्या वाढदिवसाचा केक कापल्यानंतर मित्राला रिक्षाने सोडण्यासाठी गेला होता. मित्राला सोडून तो पुन्हा एमआयडीसी रोडने घरी परतत असताना भरधाव वेगात असलेल्या रिक्षावरील त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे त्याची रिक्षा रस्ता दुभाजकावर धडकल्याने विकास सरोज जबर जखमी झाला. त्यामुळे त्याला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. विकास सरोज याने बेदरकारपणे भरधाव वेगात रिक्षा चालवून नेल्याने त्याची रिक्षा रस्ता दुभाजकाला धडकून अपघात झाल्याचे आढळून आले आहे.

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांची शासकीय आरोग्य तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता पाचवी ते दहावी अखेर शालेय विद्यार्थ्यांची शासकीय आरोग्य तपासणी करण्यात आली.



महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. आनंद शिंदे त्याचप्रमाणे गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. आरती गुप्ते आणि आरोग्य परिचारिका चंद्रकला आग्रावकर या तपासणी शिबिरात सहभागी झाले.

विद्यालयाच्या वतीने आरोग्य तपासणी विभागाच्या वतीने डॉ. आनंद शिंदे डॉ. आरती गुप्ते आणि परिचारिका चंद्रकला आग्रावकर यांचे स्वागत करताना उपशिक्षक सागर रंधवे यांनी दरवर्षी आरोग्य विभाग अत्यंत परिणामकारकपणे आणि वेळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करतात व अत्यावश्यक वैद्यकीय गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय उपाय योजना सुचवतात आणि त्याची अंमलबजावणी करतात याबद्दल आरोग्य विभागाचे आभार मानले. या वेळी विद्यालयाच्या आरोग्य तपासणी विभागाचे प्रमुख एकनाथ ठाकूर आणि गुरुकुल प्रमुख संदीप भोईर उपस्थित होते.

# ओव्हरहेड वायर तुटल्याने हार्बर रेल्वेसेवा विस्कळीत

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईच्या हार्बर मार्गावरील सर्व लोकल सेवा ठप्प झाली होती. ओव्हर हेड वायर तुटल्याने या मार्गावरील सर्व लोकल सेवा ठप्प झाल्याचे सांगितले गेले. साधारण साडेतीन वाजल्यापासून या मार्गावरील लोकल सेवा ठप्प झाल्यामुळे लाखो प्रवाशांना याचा फटका बसला.

मिळालेल्या माहितीनुसार, नेरूळ रेल्वे स्थानकाजवळ दुपारी साडेतीनच्या सुमारास ओव्हर हेड वायर तुटल्याने या मार्गावरील सर्व लोकस सेवा ठप्प झाली. हा बिघाड दुरूस्त करण्याचे काम मध्य रेल्वेकडून युद्धपातळीवर करण्यात आले असून, या बिघाडामुळे सीएसएमटीकडून येणाऱ्या आणि सीएसएमटीकडे जाणाऱ्या गाड्यांवर याचा खूप मोठा परिणाम झाला. या मार्गावरील लोकल सेवा पूर्ववत होण्यासाठी काही वेळ लागू शकतो, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले होते.



**पनवेल : भाजप महिला मोर्चाच्या सपना पाटील यांच्या घरी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, प्रदेश सदस्य दर्शना भोईर, प्रज्ञा पाटील, कविता पाटील, स्वाती कुडावकर, तेजश्री पाटील, रेखा कुडावकर, सरिता ठाकूर, प्रिया भोपी, सुभदा गावंड आदी उपस्थित होत्या.**

# ‘टीआयपीएल’तर्फे हेल्मेटचे वाटप

## पाडेघरमध्ये रस्ता सुरक्षासंदर्भातही मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत गव्हाण फाटा वाहतूक शाखा व ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. (टीआयपीएल) एचआर विभाग पाडेघरच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १६) पाडेघर येथे दुचाकी, चारचाकी वाहनचालक कर्मचाऱ्यांना रस्ता सुरक्षेसंबंधी मार्गदर्शन करण्यात आले. त्या वेळी माहिती पुस्तिकेचे व सहा दुचाकी चालकांना हेल्मेटचे विनामूल्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला गव्हाण फाटा वाहतूक शाखेतर्फे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलाणी, पालीस नाईक मस्के, पोलीस शिपाई शिंदे आणि कंपनी कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि.च्या वतीने नेहमीच सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात.





# नवी मुंबईत मराठा समाज वधू-वर मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईमधील सानपाडा येथील मराठा विकास प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी (दि. २२) दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत मराठा समाजाचा वधू वर परिचय मेळावा आयोजित केला आहे.

हा मेळावा सानपाडा सेक्टर ८ येथील केमिस्ट भवन हॉल येथे होणार आहे. या मेळाव्याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मराठा विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष जालिंदर भोर, सचिव किरण नलावडे, खजिनदार विष्णुदास मुखेकर, उपाध्यक्ष शिवाजी पाटील, सहसचिव ज्ञानेश्वर जाधव यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी मराठा विकास प्रतिष्ठान कार्यालय मोबाईल नंबर ९९६७८०५४५५ यावर संपर्क साधावा,अशी माहिती संस्थेचे सहसचिव मारुती विश्वासराव यांनी दिली.

दरम्यान, अशा एखाद्या समाजाच्या वधू वर मेळाव्यामुळे सामाजिक एकोपा जपण्यास मदत होते.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कोकण भवनात पुस्तक प्रदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन भाषा संचालक विजया डोनीकर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १६) करण्यात आले. कोकण विभागाचे भाषा संचालनालय, विभागीय आयुक्त कार्यालय, विभागीय माहिती कार्यालय आणि बृहन्मुंबई राज्य कर्मचारी संघटना, कोकण भवन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम करण्यात येत आहे.



या वेळी कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, मुंबई व कोकण विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश शेट्ये, कोकण विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले, तहसीलदार प्रितीलता कौरथी माने तसेच कोकण भवनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त होण्यासाठी, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर १४ जानेवारी ते २८ जानेवारी हा कालावधी ’मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ म्हणून साजरा करण्यात येत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी संस्कृती मंडळ तथा राज्य मराठी विकास संस्था यांनी राज्यातील पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, मुंबई आणि कोकणातील रत्नागिरी याठिकाणी असलेल्या साहित्य संस्थांची मदत घेऊन हा पंधरवडा यशस्वी करण्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोशल मीडियावर देखील ही चळवळ सुरू झाली आहे. हा पंधरवडा साजरा करताना समाज माध्यमे, वृत्तपत्रे आणि वाहिन्यांव्दारे प्रसिध्दी करण्यात येणार असल्याचे या शासन निर्णयात सांगण्यात येणार आहेत.


मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त कोकण भवनात मांडण्यात आलेले हे पुस्तक प्रदर्शन याच उपक्रमाचा भाग असून हे प्रदर्शन दि. २८ जानेवारी २०२३ पर्यंत राहणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० अशी असणार आहे.

भाषा संचालनालयामार्फत प्रकाशीत करण्यात आलेल्या विविध प्रकाशनांचा समावेश या पुस्तक प्रदर्शनात करण्यात आला आहे. कोकण भवनात येणारे नागरीक आणि विशेषत: कोकण भवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या पुस्तक प्रदर्शनास आवर्जून भेट द्यावी. असे आवाहन महाराष्ट्र राज्य भाषा संचालक श्रीमती विजया डोनीकर यांनी यावेळी केले.

# खारघर येथे रांगोळी स्पर्धा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल, खारघर रहिवासी संघटना व रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर मॅरेथॉन २०२३चे आयोजन केले आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून चतुर्भुज सोसायटीमधील ब्यूटिफुल शॉपच्या समोर रविवारी (दि. १५) रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती.




ही स्पर्धा घेण्यामागचा प्रमुख उद्देश खारघर मधील सर्व नागरिकांमध्ये व्यसनमुक्ती विषयी जनजागृती करणे हा होता. या स्पर्धेमध्ये खारघर मधील वेगवेगळ्या वेगवेगळ्या महाविद्यालयातील तसेच सोसायटीमधील स्पर्धकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला तसेच या स्पर्धेचे समन्वयक नेत्रा पाटील, खारघर रहिवासी संघटनेचे सदस्या साधना पवार तसेच रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व या स्पर्धांचे इतर सर्व समन्वयक, इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

या रांगोळी स्पर्धेचे परीक्षक म्हणून रवींद्र मोरे हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक अंजली खोंड, द्वितीय क्रमांक विलास पाटील व तृतीय क्रमांक आदिती भट यांनी पटकाविले. खारघर मॅरेथॉन पूर्व स्पर्धांसाठी आमदार प्रशांत ठाकूर व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी सदस्य व खारघर मॅरेथॉन २०२३चे व्यवस्थापकीय संचालक परेश ठाकूर यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे.

# पनवेल महापालिकेच्या शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागातील इयत्ता पहिली ते पाचवीच्या शिक्षकांसाठी डोअर स्टेप स्कूल फाउंडेशनमार्फत लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय येथे एक कार्यशाळा घेण्यात आली होती. या कार्यशाळेत मुलांना शिक्षण देण्याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या ४० शिक्षकांनी आणि चार मुख्याध्यापकांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात डोअर स्टेप स्कूल फाऊंडेशन मार्फत सुरेखा अंबोकर, शुभांगी गव्हाणकर, हर्षला बरफ, विलास कांबळे यांनी मार्गदर्शन केले. वयानुरूप इयत्तेत नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांना १२० दिवसांमध्ये प्रगत करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ’निपुण भारत’ या कार्यक्रमास समांतर कार्यक्रम डोअर स्टेप फाउंडेशनने तयार केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मुलांना शिक्षण देण्याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

# रसायनीत श्रामणेर शिबिराचा समारोप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात दि बुद्धीष्ट सोसायटी ऑफ इंडिया रायगड जिल्हा अतंर्गत रसायनी पाताळगंगासह पनवेल तालुका श्रामणेर शिबिराचा समारोप झाला.

या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन रसायनी येथे बोलताना दी बुद्धीष्ट सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय सचिव बी. एच. गायकवाड यांनी सांगितले की, बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी महाउपासीका मिराताई आंबेडकर, भिमराव आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली लाखो कार्यकर्ते प्रयत्नाची पराकष्ठा करीत आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी तन मन धनाने सहभागी व्हावे, असे गायकवाड यांनी केले आहे.

या वेळी महाराष्ट्र राज्य सरचिटणीस सुशील वाघमारे, कोषाध्यक्ष विजय कांबळे, केंद्रीय महिला विभाग सदस्या सुनदा वाघमारे, रायगड जिल्हा सरचिटणीस विजय कांबळे, उषा कांबळे कमलताई कांबळे आदींसह रायगड जिल्हा पदाधिकारी पनवेल तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुल कांबळे हे होते. या कार्यक्रमाची व्यवस्था समता सैनिक दलाने केली होती. या वेळी विविध कार्यक्रम झाले.



# रायगडात सुगंधी, आकर्षक जांभळ्या मंजिरीचा बहर

## निसर्गाचा अद्भूत आविष्कार पाहण्यासाठी निसर्गप्रेमींची रेलचेल

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड़ जिल्ह्यातील बहुसंख्य शेतांमध्ये जांभळी मंजिरीची सुगंधी व आकर्षक फुले बहरली आहेत. जिल्ह्यात जांभळ्या मंजिरीचे क्षेत्र वाढले असल्याचे निरीक्षण निसर्ग अभ्यासकांनी नोंदविले आहे. निसर्गाचा हा अद्भूत आविष्कार पाहण्यासाठी अनेक अभ्यासक व निसर्ग प्रेमींची रेलचेल पहायला मिळत आहे.

जांभळी मंजिरी ही पान वनस्पती असून हिचे शास्त्रीय नाव (पोगोस्टेमॉन डेक्क्नेनसिस ) असे आहे. सुप्रसिद्ध कास पठारावर ही मुबलक प्रमाणात आढळते परंतु फुलोरा मात्र सप्टेंबर ते ऑक्टोबर या महिन्यात येतो. तर कोकणसह रायगड जिल्ह्यात आढळणारी जांभळी मंजिरी भात कापणी झाल्यावर रुजून येते व फुलोरा मात्र नोंव्हेबर व डिसेंबर महिन्यात येतो. हा बदल अधिवास वेगळा असल्याने होतो.



(छाया : धम्मशील सावंत)

जिल्ह्यात सुद्धा सड्यावर होणारी मंजिरी लवकर फुलते. असे जिल्ह्यातील प्रसिद्ध निसर्ग अभ्यासक प्रवीण कवळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

संपूर्ण शेत किंवा शेताचा काही भागावर फुललेली ही मनमोहक फुले पाहून जणु काही जांभळ्या रंगाची झालरच पांघरली आहे असे वाटते. आजूबाजूच्या परिसरातही मंजिरीचा सुवास दरवळत असतो. परिणामी ही मनमोहक व आकर्षक फुले अनेकांचे लक्ष वेधून घेतात. येथून जाणारे अनेक प्रवासी व वाटसरू मंजिरीची ही जांभळी झालर पाहण्यासाठी आवर्जून थांबतात. काहीजण तर येथे नियमित देखील येतात. जांभळ्या मंजिरीचा हा अद्भुत नजारा काही दिवसच पहायला मिळतो फेब्रुवारीनंतर हवामानात बदल होऊ लागला की ही फुले व झुडपे सुकून जातात. आणि पुढील वर्षी पावसाळा सरल्यावर व हिवाळा सुरू झाल्यानंतर पुन्हा एकदा जांभळी मंजिरी बहरते. बुटकी आणि झुडुपवजा असलेल्या या झाडांची पाने हिरव्या रंगाची असतात. यांना आकर्षक रंगाची जांभळी फुले तुऱ्यांप्रमाणे येतात. सकाळी धुक्याचे दवबिंदू या फुलांवर पडल्यावर ते अधिकच आकर्षक व खुलून दिसतात.

जांभळ्या मंजिरीची झाडे सुगंधी द्रव्याने युक्त असतात. त्यामुळे यापासून वेगवेगळी सुगंधी तेल काढली जातात. तसेच सुगंधी द्रव्य बनविण्यासाठी देखील वापरले जाते.

> **हा निसर्गाचा एक मनमोहक आविष्कार आहे. ठराविक कालावधीतच आणि विशिष्ट शेतांमध्येच जांभळी मंजिरी फुललेली दिसते. पर्यावरणाच्या साखळीमध्ये तिचेही काही योगदान आहे. जांभळ्या मंजिरीच्या प्रजातीचे संरक्षण होणे आवश्यक आहे. या हंगामात हमखास ही फुले पाहण्यासाठी या ठिकाणी येतो. शाळकरी मुलांनी देखील अशा ठिकाणी भेट देणे आवश्यक आहे.**
>
> **– राम मुंढे, निसर्ग अभ्यासक शिक्षक, पाटणूस–विळे**

### जिल्ह्यात मंजिरीचे क्षेत्र वाढतेय

**जिल्ह्यात जांभळी मंजिरीचे प्रमाण जास्त जाणवू लागले आहे. त्यांची दोन तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे ती पूर्वीपासून आहेच, पण कास पठार प्रसिद्ध झाल्यापासून अनेकजण तिला आवर्जून बघायला लागले. तसेच दुसरे कारण म्हणजे जिल्ह्यात शेती करण्याच्या पद्धती बदलत चालल्या आहेत पूर्वी बहुतांश शेतकरी भात पीक घेतल्यानंतर दुबार पीक म्हणून वाल. हरभरा. चवळी किवा मुग वगैरे सारखी पिके घ्यायचे त्यासाठी पुन्हा नांगरट करावी लागायची त्यामुळे बऱ्याच प्रमाणात मंजिरी नष्ट व्हायची. मात्र अलीकडे पडीक शेतीचे प्रमाण सुद्धा वाढत आहे. त्यामुळे मंजिरीचे क्षेत्र वाढत आहे. असे निसर्ग अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले.**

---

# भारत देशाला परमवैभवाला नेण्याचे संघाचे उद्दिष्ट –स्वप्निल पुराणिक

**खोपोली : प्रतिनिधी**

भारत देशाला परमभैरवाला नेण्याचे उद्दिष्ट संघाचे असून त्या दृष्टीने संघांच्या नियमित शाखांच्या माध्यमातून केले जात असल्याचे स्वप्निल पुराणिक यांनी खोपोली येथे सांगितले.



रा. स्व. संघ खोपोली प्रांत शाखेच्यावतीने मकर संक्रांत व तिळगुळ वाटप कार्यक्रम वरची खोपोली येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून पुराणीक बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खालापूर तालुका कार्यवाह अविनाश मोरे उपस्थित होते.

त्यांनी आपल्या भाषणात रा. स्व. संघाची स्थापना व संघाच्या कार्याची माहिति विस्तृतपणे दिली. संघाचे कार्य तळागाळापर्यंत विविध शाखांच्या माध्यमातून सुरू असून, संघाचे कार्य देशभरात व विविध देशातून सुरू असल्याचे सांगितले. संघाच्या नियमित शाखेत जातीपातीला थारा दिला नाही तर या देशातील प्रत्येक नागरिक हा आपला भाऊ असून, त्याच्याप्रती स्नेहा पोटी रक्षाबंधनाला राखी बांधली जाते तर मकर संक्रातीला तिळगुळ वाटप करीत असतो असे सांगितले. संघाच्या पारंपरिक प्रार्थना येथील अनेक मुलींचा संदर्भ देताना राष्ट्रहित हेच प्रमुख संघाचे उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगितले.

प्रारंभी संघपरंपरेनुसार ध्वजारोहण व ध्वजप्रणाम करण्यात आले. त्याचवेळी अमृतवचन तेजस जोशी तर वैयक्तिक पद्य प्राप्त शाखेचे नगरकार्यवाह दीपक कुवळेकर यांनी सादर केले. तसेच सांघिक पद्य नगरसहकार्यावह अभिषेक नागर तर वक्ता परिचय विरेश्वर शाखेचे कार्यवाह उपेंद्र करमरकर यांनी केले. या कार्यक्रमाला शाखेचे स्वयंसेवक व नागरिक उपस्थित होते. शेवटी तिळगुळ वाटप करण्यत आले. संघाच्या प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची समाप्ती झाली.


---

# मुरुड परेश नाका येथे निवारा शेड व्हावी!

## पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळातर्फे नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

गेल्या कित्येक वर्षांपासून मुरुडच्या परेश नाका येथे प्रवासी वर्गाची निवारा शेड अभावी होणारी गैरसोय लक्षात घेऊन याठिकाणी निवारा शेड व्हावी. अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे कि, कित्येक वर्षापासून मुरुड शहराचा विकास रखडलेला होता, परंतु मागील १ वर्षामध्ये मुरुड शहरातील मुख्य रस्ते, गल्ली बोळातील कॉक्रीट रस्ते, गार्डन, अशा व अनेक प्रकारची विकासाची कामे करुन आपण मुरुड शहराचा कायापालट करून टाकला त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो.

परेश नाका येथे प्रवासी निवारा शेड ही आमची कोणतीही वैयक्तिक मागणी नसून मुरुड शहराच्या प्रवेशव्दारा जवळच प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी एक छोटीशी व सुंदर प्रवाशी शेड बनविण्याची मागणी करीत आहे. तसेच येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग परेश हॉटेल नाक्यावर प्रवासी शेड होण्याबाबत जवळपास तीन–चार वर्ष पत्र व्यवहार करत आहे. परेश हॉटेल नाक्यावर जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम खाते या कार्यालयामध्ये पूर्वी तिथे एक शेड होती ती काही वर्षांपूर्वी मोडकळून पडली आहे. तिथे एक प्रवासी शेड असावी. कारण बाजूलाच ग्रामीण रुग्णालय आहे. खेडेगावातून आलेले गरीब रुग्ण एस.टी. ची वाट पाहत उन्हा पावसात उभे राहतात. तसेच येथून काही अंतरावर सर्व शासकीय कार्यालये आहेत. शासकीय कर्मचारी, कार्यालयांत आलेले नागरीक, नगरपरिषद शाळेची मुले व पर्यटक एस.टी. ची वाट पाहत तासनतास उन्हातान्हात पावसात तिथे उभे राहून एस. टी. गाडीची वाट पाहत प्रतिक्षेत थांबतात. काही वर्षापूर्वी तिथे बसायचा कडप्पाचा बाकडा स्वखर्चाने बनवला आहे. सांगण्याचे तात्पर्य म्हणजे सध्या मुरुड शहराचा विकास, पर्यटकांचा व स्थानिक लोकांचा विचार करून खूप सुंदर सजवलेले आहे. अजून काही ठिकाणी कामे सुरू आहेत. हे सर्व करत असताना लवकरात लवकर प्रवाशांना बसण्याकरीता प्रवासी शेड बांधून सविधा उपलब्ध करून देण्यात यावी, असे अरविंद गायकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले असून निवेदनाच्या प्रती सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंत्यांना देण्यात आलेल्या आहेत. यावेळी शैलेश वारेकर, दिव्व्या सतविडकर, दामोदर खयगावकर उपस्थित होते.

---

# वक्तृत्व स्पर्धेतून नेतृत्वगुण प्राप्त होतात –प्रा. डॉ. अतुल सांळुखे

**रोहा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात असताना ही आमच्या महाविद्यालयांला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळाले आहे. हे ग्रामीण भागातील महाविद्यालय असलेले तरी गुणवत्ता महाविद्यालयात आम्ही निर्माण करतो. आज आयोजीत केलेल्या वकृत्व स्पर्धेच्या व्यासपीठावरून बाहेर पडलेले विद्यार्थी समाजात नेतृत्व करत आहेत. या स्पर्धेच्या माध्यमातून समाजात जात असताना मुलांमध्ये नेतृत्व गुण प्राप्त होत असल्याचे डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांनी व्यक्त केले





सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा व डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ. कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा यांच्या वतीने डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे सी. डी. देशमुख महाविद्यालय येथे बोलत होते.

यावेळी सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा माजी अध्यक्ष मकरंद बारटक्के, अविनाश दाते, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट अध्यक्ष चंद्रकांत पार्टे, अमेय जोशी, प्रा.तुलशीदास मोकल, प्रा.डॉ कमलाकर कांबळे, स्पर्धा प्रमुख सम्राट जाधव, प्रा.डॉ.अनिल शिंदे, प्रा.सुकुमार पाटील, प्रा. सिमा भोसले, अमित उकडे, सचिन कुलकर्णी, प्रेषित बारटक्के, भारत वाकचौरे, हर्षद भाटे, प्रितम देशमुख, हेमंत शेवाळे, सुहास दहीवलकर, प्रा.वैशाली कानवडे, प्रा.शत्रुघ्न लोहकरे, प्रा.थोरात, सुधीर क्षिरसागर, अतुल करवा, दुर्गेश नाडकर्णी आदी उपस्थित होते.सार्वजनिक गणेशोत्सव रोहा ट्रस्टचे माजी अध्यक्ष मकरंद बारटक्के यांनी १९९६ साली डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या नावाने वकृत्व स्पर्धा करण्याचे ठरविण्यात आले. सुरुवातीला तालुका, जिल्हा नंतर राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात येत आहे. डॉ सी. डी. देशमुख हे स्वाभिमानी होते.त्यांच्याकडे प्रचंड आत्मविश्वास होते. संस्कृतचे प्रचंड ज्ञान होते.आपल्या मातृभुमीवर प्रचंड प्रेम असल्याने परदेशात ही आपल्या घराला रोहा हे नाव दिले असल्याचे सांगितले.माजी अध्यक्ष अविनाश दाते यांनी या स्पर्धेतील विषय वेगवेगळे असतात. विषय नेहमी चर्चेचे असतात असे सांगितले. प्रास्ताविकात सम्राट जाधव यांनी डॉ. चिंतामणराव देशमुख राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा हा उपक्रम शिक्षक व विद्यार्थी यांचे समन्वयक आहे. सार्वजनिक व्यासपीठ विद्यार्थ्यांना या स्पर्धेतुन मिळते. या स्पधेतून चांगले वक्ते व नागरीक घडविण्याचे काम होत असते. परीक्षक म्हणून भारत चौधरी, अंजली पुराणिक यांनी काम पाहिले. सुत्रसंचालन प्रा सुकुमार पाटील यांनी तर अभार चंद्रकांत पार्टे यांनी मानले.

---

# अलिबाग येथे फेब्रुवारीमध्ये राज्यस्तरीय अभिनय स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

फ्रायडे फिल्मस अलिबाग यांच्यातर्फे कै. लेखक, दिग्दर्शक विजय बारसे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विजयश्री २०२३ राज्यस्तरीय एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धा २० फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे हे सहावे वर्ष .



एकपात्री आणि द्विपात्री अश्या दोन विभागात होणाऱ्या स्पर्धेसाठी, वय वर्ष १४ ते ४५ अशी वयोमर्यादा असेल. स्पर्धेच्या सादरीकरणाची भाषा मराठी असून, एकपात्रीसाठी ५ ते ७ मिनिटं आणि द्विपात्रीसाठी ८ ते १० मिनिटं अशी वेळ मर्यादा असेल. स्पर्धेतील विजेत्यांसाठी पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम असे बक्षिस दिले जाईल.

अलिबाग तसेच रायगडमधील एकपात्री व द्विपात्री कलाकारांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी – विवेक ९७६२२६०९७१, अश्रीता ७०३८५५७७४२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन फ्रायडेफिल्म्स प्रॉडक्शनचे स्पर्धा प्रमुख किरण विजय साष्टे यांनी केले आहे.

---

# पालीवाला महाविद्यालयात रंगणार उड्डाण महोत्सव

## पथनाट्य, भित्तीपत्रक, वक्तृत्व, पोवाडा, लेखन स्पर्धाही घेणार

**पाली : प्रतिनिधी**

शिक्षणात अग्रगण्य असणाऱ्या मुंबई विद्यापीठात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यापैकी एक उपक्रम म्हणजे आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागाचा आत्मा म्हणजे उड्डाण महोत्सव. मुंबई विद्यापीठामध्ये मुंबई आणि कोकण असे दोन विभागात प्रामुख्याने विविध महाविद्यालयांमध्ये महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी रायगड, पनवेल व नवी मुंबई भागातील महाविद्यालयांसाठी पालीतील शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयात मंगळवारी (ता.१७) आयोजित केला आहे.

कोरोनाच्या महामारीनंतर प्रथमच महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवाच्या नियोजनासाठी प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयात सभा झाली. या सभेमध्ये विविध समित्या स्थापन करून कामाचे नियोजन करण्यात आले.

उड्डाण कार्यक्रमासाठी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, कार्याध्यक्षा गीता पालरेच्या, मानद सचिव रविकांत घोसाळकर व सर्व संचालक मंडळाने या कार्यक्रम आयोजनाचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव सुधीर पुराणिक आणि आजीवन अध्ययन विस्तार कार्य विभागाचे संचालक डॉ. कुणाल जाधव यांनी हा कार्यक्रम घेण्यास अनुमती दिली. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहुपचांग, क्षेत्रीय समन्वयक देविदास शिवपुजे, विस्तार कार्य शिक्षक यशवंत भांडकोळी व दिलीप निकम तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापिकेतर कर्मचारी यांनी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याचा निश्चय केला आहे.

उड्डाण महोत्सवासाठी जवळपास २३ महाविद्यालयातील ३५० विद्यार्थी आणि ५० विस्तार कार्य शिक्षकांनी सहभागी होण्याची संमती दर्शविली आहे. या सर्वांसाठी चहा, नाश्ता आणि भोजन व्यवस्था महाविद्यालयात करण्यात येणार आहे.

महोत्सवात पाच वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या पाच स्पर्धा म्हणजे –१) पथनाट्य स्पर्धा २) भित्तिपत्रक स्पर्धा ३) वकृत्व स्पर्धा ४) सर्जनशील लेखन ५) पोवाडा या स्पर्धा आहेत.



# भारत-इंग्लंड सामना अनिर्णीत



## हॉकी वर्ल्डकप

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

एफआयएच हॉकी विश्वचषक स्पर्धेतील भारतीय संघाचा दुसरा सामना इंग्लंडसोबत अनिर्णित राहिला. पहिल्या सामन्यात स्पेनविरुद्ध विजय मिळवणाऱ्या टीम इंडिया इंग्लंडला हरवून सलग दुसरा सामना जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरली होती, मात्र तसे झाले नाही. या सामन्यात १२ पेनल्टी कॉर्नरवर एकही गोल झाला नाही. त्यामुळे सामना ०-० असा बरोबरीत सुटला. दोन्ही संघांना प्रत्येकी एका गुणावर सामधान मानावे लागले.

या सामन्याच्या दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने जबरदस्त पलटवार केला. सामन्याच्या २३व्या आणि २५व्या मिनिटाला भारताला तीन पेनल्टी कॉर्नर मिळाले, पण भारतीय संघाला एकही गोल करता आला नाही, मात्र भारताच्या आक्रमणाने इंग्लंड संघाला नक्कीच अडचणीत आणले होते, ज्यामुळे इंग्लंडचे आक्रमण थोडेसे कमकुवत झाले होते.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने शानदार खेळ केला आणि आक्रमणे सुरूच ठेवली, पण इंग्लंडने शानदार बचाव करत एकही गोल होऊ दिला नाही. तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने गोल करण्याच्या दोन उत्तम संधी निर्माण केल्या, मात्र त्याचे रूपांतर करता आले नाही.

यापूर्वी हे दोन्ही संघ राष्ट्रकुल स्पर्धेत आमनेसामने आले होते. तो सामना ४-४ असा बरोबरीत सुटला होता. दोन्ही संघांमधील मागील पाच सामन्यांबद्दल बोलायचे झाले, तर भारताने दोन सामने जिंकले आहेत. त्याचबरोबर एक सामना इंग्लंडच्या नावावर राहिला आहे. उर्वरित दोन सामने अनिर्णित राहिले. दोन्ही संघांमध्ये नेहमीच निकराची लढत झाली आहे.

भारताचा पुढील सामना १९ जानेवारी होणार आहे. या सामन्यात भारताला वेल्स संघाचे आव्हान असणार आहे. उप-उपांत्य फेरीत पोहचण्यासाठी या सामन्यात टीम इंडियाला विजय आवश्यक असणार आहे.





**पनवेल : तालुक्यातील रोहिंजण येथे कै. चंद्रकांत क्रीडा मंडळ करंजावडेच्या वतीने प्रथमच क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवांतर्गत समाजस्तरीय कबड्डी स्पर्धा कै. सरस्वती बाबाजीराव कदम क्रीडानगरीत रंगली. या स्पर्धेला भाजपचे जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व आयोजकांचे कौतुक केले. या वेळी ठाणे महापालिकेचे माजी महापौर संजय मोरे, नवी मुंबई पोलीस निरीक्षक संजय कदम, समीर कदम, अक्षय शिंदे आदी उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम, शिवशक्तीला जेतेपद



**पाचगणी : प्रतिनिधी**

पाचगणी व्यायाम मंडळाच्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे दोन्ही अंतिम सामने अखेरच्या चढाईपर्यंत रंगतदार ठरले. मुंबईच्या भारत पेट्रोलियमने मुंबईच्याच बँक ऑफ बडोदाला २९-२७ अशी धूळ चारून निमंत्रितांच्या व्यावसायिक पुरुष गटाचे जेतेपदाचा गंगुबाई शिंदे स्मृतिचषक आणि ७५ हजार रुपये रोख बक्षीस पटकाविले. महिलांमध्ये मुंबईच्या शिवशक्ती महिला संघाने पुण्याच्या राजमाता जिजाऊ संघाला ३२-२९ असे हरवून गंगुबाई शिंदे स्मृतिचषक आणि ४५ हजार रुपये रोख बक्षिसाचा मान मिळवला. शिवशक्तीचे हे हंगामातील पाचवे विजेतेपद ठरले.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात चौथ्या मिनिटालाच भारत पेट्रोलियमने बँक ऑफ बडोदावर लोण चढूवन ९-२ अशी आघाडी घेतली, तेव्हा हा सामना एकतर्फी होईल असे अंदाज बांधले जात होते. बँक ऑफ बडोदाला हे मान्य नव्हते. १२व्या मिनिटाला त्यांनी लोणची परतफेड करीत १०-१० अशी बरोबरी साधली. तरीही पहिल्या सत्राअखेरीस भारत पेट्रोलियमने १५-१२ अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या सत्रात भारत पेट्रोलियमने आपली आघाडी २५-१७ अशी वाढवली, पण बँक ऑफ बडोदाच्या नितीन देशमुखने एका चढाईत चार गुण मिळवत २१-२५ अशी आघाडी कमी करीत सामन्यात रंगत निर्माण केली. पुढे पाच मिनिटे बाकी असताना बँक ऑफ बडोदाने दुसरा लोण चढवत हे अंतर २५-२७ अशी कमी केली. सामना संपायला दीड मिनिटाचा अवधी असताना २७-२७ अशी बरोबरी झाली होती, पण अक्षय सोनीने प्रतिस्पर्धी संघाचा बचाव भेदून चढाईत गुण घेत एका गुणाची आघाडी भारत पेट्रोलियमला मिळवून दिली. मग गिरीश इरनाकने एकट्याने विशाल देहयष्टीचा चढाईपटू नितीनला मैदानाबाहेर रेटून पकडीचा एक गुण मिळवत भारत पेट्रोलियमला २९-२७ अशी निर्णायक आघाडी मिळवून दिली. दोन्ही संघांच्या उर्वरित एकेक चढाया निष्फळ ठरल्या आणि याच गुणसंख्येवर भारत पेट्रोलियमने विजयाचा जल्लोष साजरा केला. हुकमी पकडींच्या बळावर भारत पेट्रोलियमच्या विजयाचा शिल्पकार ठरलेला उजवा कोपरारक्षक निलेश शिंदे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा मानकरी ठरला. बँक ऑफ बडोदाच्या प्रणय राणेने या स्पर्धेत लक्षवेधी खेळ करीत चाहत्यांची मने जिंकली.

महिलांच्या अंतिम सामन्यात राजमाता जिजाऊ संघाने पाचव्या मिनिटाला शिवशक्तीवर लोण चढवत १०-५ अशी आघाडी मिळवली. हे द्वंद्व मध्यांतराला १८-१४ असे राजमाता जिजाऊ संघाच्या बाजूने होते, पण दुसऱ्या सत्राच्या तिसऱ्याच मिनिटाला शिवशक्तीने लोण परतवत सामन्यावर पकड निर्माण केली. दोन्ही संघांची बचावफळी उत्तम कार्य करीत होती. याशिवाय राजमाता जिजाऊ संघाकडून सलोनी गजमल आणि मंदिरा कोमकर, तर शिवशक्तीकडून पूजा यादव आणि रेखा सावंत यांच्या चढायांमुळे सामन्यात रंगत आली. अखेरच्या काही मिनिटांत ती आणखी वाढली. सलोनीची साधना विश्वकर्माने पकड केल्यामुळे राजमाता संघ पिछाडीवर पडणार अशी चिन्हे असतानाच मंदिरा कोमकरने दोन सलग चढायांमध्ये बोनससह एकेक गुण घेत राजमाताला २९-२९ अशी बरोबरी साधून दिली, पण शेवटून दुसऱ्या चढाईत पूजाने तीन गुणांची कमाई करीत सामना ३२-२८ असा शिवशक्तीकडे झुकवला. मग शिवशक्तीने राजमाता संघाच्या कोमलला अखेरच्या चढाईत एक गुणापर्यंत मर्यादित ठेवले आणि सामना जिंकला. पूजा यादव स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली.

# उलवे स्पोर्ट्स अकॅडमीत तायक्वॉन्डो प्रशिक्षण अन् हॉलिबॉल मैदान

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





(छाया : योगेश पाटील)

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**


उलवे स्पोर्ट्स अकॅडमी सुरू झाल्याने मुलांच्या, तरुणांच्या कलागुणांना चालना देण्याचे काम होणार आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी (दि. १५) केले. उलवे नोड सेक्टर १९अ उन्नती सोसायटीच्या बाजूला ऑलम्पिकच्या तायक्वॉन्डो खेळाचे प्रशिक्षण आणि हॉलिबॉल खेळाचे मैदान उभारण्यात आले आहे. या मैदानाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.

उलवे नोड परिसरात वाढत्या शहरीकरणासोबतच विविध सुविधाही उपलब्ध होत आहेत. सचिन मोरे, प्रभाकर भोईर, सुभाष पाटील यांच्या नेतृत्वाखाली उलवे स्पोर्ट्स अकॅडमी सुरू करण्यात आली आहे. या अकॅडमीत ऑलम्पिकच्या तायक्वॉन्डो आणि हॉलिबॉल खेळाचे प्रशिक्षण मिळणार असून यासाठी मैदान बांधण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या समारंभास वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप नेते अंकुश ठाकूर, उलवे नोड उपाध्यक्ष शैलेश भगत, युवा नेते निलेश खारकर, ब्लॅक बेल्ट इंटरनॅशनल रेफरी सुभाष पाटील, दि पिपल्स वेल्फेअर चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र कदम, विक्रम कोळी, दीपक गोंधळी, संतोष ठाकूर, प्रवीण ठाकूर, हरी घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, उलवे स्पोर्ट्स अकॅडमीचा फायदा हा सर्व उलवे नोड परिसराला होणार असून त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन दिले.

# ऐन सामन्यादरम्यान नदालचे रॅकेट गायब



**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत फ्रान्सचा दिग्गज खेळाडू राफेल नदालला पहिल्याच सामन्यात धक्कादायक अनुभव आला. सलामीची लढत जॅक ड्रॅपरविरुद्ध सुरू असताना नदालने रॅकेट बदलण्याचा निर्णय घेतला, मात्र त्याची रॅकेट गायब होती. त्यामुळे टेनिस कोर्टवर एकच खळबळ उडाली.

बसण्याच्या ठिकाणी रॅकेट नसल्याचे पाहून नदालला धक्का बसला. त्यानंतर बॅगमध्येही रॅकेट नसल्याचे पाहून तो पुरता कावराबावरा झाला. मग कालांतराने त्याच्या लक्षात आले की बॉलबॉय दुरुस्त करण्यासाठी चुकीचे रॅकेट घेऊन गेला. याबाबत पंचांकडे त्याने आपली व्यथा मांडली. अखेर नदालने आपल्या बॅगेतून दुसरे रॅकेट काढून सामना खेळण्यास सुरुवात केली आणि सामना जिंकून विजयी सलामी दिली.

# राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत रायगडच्या संतोष गावडेला 'रौप्य'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या यजमानपदाखाली छत्रपती संभाजीनगरमधील गारखेडा येथे सुरू राष्ट्रीय बेंचप्रेस अजिंक्यपद स्पर्धा सुरू झाली आहे. या स्पर्धेत पहिल्याच दिवशी ५९ किलो वजनी गटात रायगडच्या संतोष गावडे याने रौप्यपदक पटकाविले.

या स्पर्धेत संपूर्ण देशातून १५००पेक्षा जास्त खेळाडू सहभागी झाले होत आहेत, तर महाराष्ट्र राज्य संघातून १८० खेळाडू आपले कसब दाखविणार आहेत.

संतोष गावडे याने रौप्यपदक जिंकल्याने त्याचे महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सरचिटणीस, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आंतरराष्ट्रीय पंच संजय सरदेसाई यांनी विशेष कौतुक केले. त्याचप्रमाणे पॉवरलिफ्टिंग रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर, राष्ट्रीय पदक विजेते माधव पंडित, तसेच सचिन भालेराव, राहुल गजरमल, मोकल या सर्वांनी गावडे याचे अभिनंदन केले.

# शानदार शतकासह 'विराट' विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात विक्रमी दीड शतकी खेळी खेळली. या जोरावर विराटने अनेक विक्रम केले, ज्यामध्ये त्याने अनेक दिग्गजांना मागे सोडले.



टीम इंडियाचा आधारस्तंभ विराट कोहली एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा जगातील पाचवा फलंदाज ठरला आहे. आतापर्यंत श्रीलंकेचा माजी फलंदाज महेला जयवर्धने या नंबरवर होता, मात्र विराटने त्याला मागे टाकले आहे. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत सचिन तेंडुलकर सध्या अव्वल स्थानावर आहे. त्याने १८४२६ धावा केल्या आहेत. त्याचबरोबर कुमार संगकाराचे (१४२३४) नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. रिकी पाँटिंग (१३७०४) तिसऱ्या क्रमांकावर, तर सनथ जयसूर्याचे (१३४३०) नाव चौथ्या स्थानावर आहे. विराटच्या सध्या वनडेत १२७५४ धावा आहेत. तो लवकरच १३ हजार धावा पूर्ण करेल.

विराटने त्याच्या दीड शतकासह सचिनला मागे टाकले. हे त्याचे घरच्या मैदानावरील २१वे एकदिवसीय शतक आहे, जे भारतातील सर्वाधिक एकदिवसीय शतकांचा विक्रम आहे. शतक झळकावल्यानंतर कोहलीने आपले गिअर्स बदलले व षटकारांचा पाऊस पाडला. त्याने या डावात एकूण आठ षटकार लगावले.

याआधी विराटने एकदिवसीय डावात कधीही आठ षटकार लगावले नव्हते. म्हणजेच एका डावात हे त्याचे सर्वाधिक षटकार आहेत. त्याचबरोबर त्याने ब्रायन लारा, किरॉन पोलार्ड, शेन वॉटसन, ॲरॉन फिंच यांना एकदिवसीय सामन्यांच्या सर्वाधिक षटकांराच्या बाबतीत मागे सोडले आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये विराट कोहलीने आतापर्यंत १३६ षटकार लगावले आहेत. याबाबतीत त्याने माजी फलंदाज वीरेंद्र सेहवागची बरोबरी केली. सेहवागनेदेखील १३६ षटकार लगावले आहेत. या प्रकरणातील दोघेही संयुक्तपणे सहावे भारतीय फलंदाज आहेत. या आठ षटकारांसह कोहलीने खालील चार फलंदाजांना मागे टाकले आणि सेहवागच्या बरोबरी साधली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com